संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३१-५६/३७ पाने ८ किंमत ३ रुपये अहिल्यानगर, शनिवार दि. ०१.११.२०२५ अंक नं. १५५ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा

बस्ता
बांधायला यायचं हं!

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™

संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुध्द चांदीमधील
आकर्षक कडे, ब्रासलेट, चेन, पेंडंट, अंगठी व टॉप्सच्या असंख्य व्हरायटी.

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

महाराष्ट्रातील सर्वात मोठे थाळी रेस्टॉरंट, अहिल्यानगर मध्ये...

शिव भोज THALI RESTAURANT

|| पधारो सा ||

प्रशस्त बँक्वेट हॉल FREE
(TERMS & CONDITIONS APPLY)
बर्थडे पार्टी
ॲनिवर्सरी
मिटिंग हॉल

सोमवार दि. २७/१०/२०२५ पासुन आपल्या सेवेत

फक्त 369/- स्पेशल थाळी (मासवडी सहीत, फक्त शनिवार/रविवार)
फक्त 249/- स्पेशल दाल बाटी (भाजलेली)
फक्त 369/- स्पेशल थाळी (राजस्थानी)

भाऊबीजे निमित्त लाडक्या बहीणींसाठी खास ऑफर
सोमवार २७/१०/२०२५ ते रविवार ३०/११/२०२५ पर्यंत
299/- ~~369/-~~

दर बुधवारी खास महिलांसाठी
राजस्थानी थाळी | 299/-

वाणी प्राईड, मॅक्सच्या वरती, भारत पेट्रोल पंपाच्या जवळ, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर
9594206814




पेशवाई | श्रीमंत

सर्जेपुरा, अहिल्या नगर. 0241 2325002/3/4 | कुमठेकर रस्ता, पुणे. 020 24453730 / 24430150

शॉपिंग वर फ्री शॉपिंग

| | | |
|---|---|---|
| ₹12,000 ₹2,000 | ₹18,000 ₹3,000 | ₹24,000 ₹4,000 |
| ₹30,000 ₹5,000 | ₹36,000 ₹6,000 | ₹42,000 ₹7,000 |
| ₹48,000 ₹8,000 | ₹54,000 ₹9,000 | ₹60,000 ₹10,000 |

*T&C Apply

फ्री शॉपिंग फक्त रेडिमेड सूटिंग, शर्टिंग करिता.
ऑफर फक्त सर्जेपुरा, अहिल्यानगर शोरुम मध्ये लागू.

/peshwaishrimant | www.peshwaishrimant.com

* पैठणी * पारंपारिक साड्या * डिझायनर साड्या * घागरा * एथेनिक * ब्रँडेड रेडीमेड्स * सूटिंग * शर्टिंग * ॲक्सेसरीज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# शहरात पोलिसांचा गुन्हेगारांवरील धाक संपला; 'कोतवाली' ठाण्याजवळच झाली 'चेन स्नॅचिंग'

नगर – शहरातील गजबजलेल्या आणि मोठी वर्दळ असलेल्या माणिक चौकात रस्त्याने पायी चाललेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र विनाक्रमांकाच्या मोटारसायकलवर आलेल्या दोघा चोरट्यांनी हिसका मारून तोडून नेल्याची घटना ३१ ऑक्टोबर रोजी रात्री ८.४० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. कोतवाली पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर ही घटना घडल्याने नगर शहरात गुन्हेगारांना पोलिसांची भीतीच राहिली नसल्याचे दिसून येत आहे.

याबाबत सौ. विजया अनिल घोडके (रा. राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी बाजार पेठेत आल्या होत्या. तेथून घरी जाण्यासाठी त्या पायी निघाल्या. रात्री ८.४० च्या सुमारास त्या माणिक चौकातील आशीर्वाद चिवडा या दुकानासमोरून जात असताना विना क्रमांकाच्या केटीएम मोटारसायकल वर दोघे जण तोंडाला रुमाल बांधून आले. त्यातील पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी घोडके यांच्या गळ्यातील ८० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र हिसका मारून तोडले व दोघेही मोटारसायकलवर भरधाव वेगात निघून गेले.

घोडके यांनी आरडाओरडा केला. मात्र नागरिक गोळा होईपर्यंत आणि त्यांना नेमके काय घडलेय हे समजे पर्यंत ते चोरटे पसार झाले होते. त्यानंतर विजया घोडके यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून घडलेली घटना सांगितली. या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड, उपनिरीक्षक प्रवीण पाटील तसेच पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज मध्ये चोरटे कैद झालेत का याची पाहणी करत तपास सुरु केला. याबाबत विजया घोडके यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड हे करीत आहेत.

### चेन स्नॅचिंगसह चोऱ्या, घरफोड्यांचा तपास लागेना

उपनगरी भागात चेन स्नॅचिंगच्या घटना वारंवार होत आहेत. पण थेट मध्यवस्तीत आणि ते ही कोतवाली पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर ही घटना घडली, हे विशेष आहे. यावरून चोरट्यांची हिंमत किती वाढली आहे. हे दिसून येत आहे. शहरातील कोतवाली आणि तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत दररोज चोऱ्या, घरफोड्या होत आहेत. अधून मधून चेन स्नॅचिंग ही सुरु आहे. याबाबत गुन्हे दाखल होतात. पण त्यांचा तपासच लागत नसल्याचे चित्र आहे. १० २० चोऱ्या, घरफोड्या झाल्यावर त्यातील एखाद्या गुन्ह्याची उकल होते. बाकीचे तसेच कायम तपासावर पडून राहतात. या घटनांचा तपास लागत नसल्याने चोरट्यांचे धाडस वाढत असण्याची शक्यता आहे. ही शहर पोलिसांसाठी शरमेची बाब आहे.

## जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभाग १ ते ७५ व निर्वाचक गण क्रमांक १ ते १५० च्या अंतिम मतदार याद्या ३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार

नगर – जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभाग क्र. १ ते ७५ तसेच पंचायत समिती क्षेत्रातील निर्वाचक गण क्रमांक १ ते १५० यांच्या प्रारूप मतदार याद्यांबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांचा विचार करून, अधिप्रमाणित अंतिम मतदार याद्या तयार करण्यात आल्या आहेत. या अंतिम मतदार याद्या ३ नोव्हेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सर्व तहसील कार्यालये आणि पंचायत समिती कार्यालयांमध्ये पाहणी व निरीक्षणासाठी उपलब्ध असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल), अहिल्यानगर यांनी दिली आहे.

# शेतकऱ्यांच्या न्यायासाठी १७ नोव्हेंबरपासून अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर 'मुक्काम आंदोलन' करणार

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या खाजगी व सहकारी साखर कारखान्यांना इशारा देण्यात आला आहे. ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात झालेल्या बैठकीत सर्व खाजगी व सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी व अन्यायग्रस्त शेतकरी उपस्थित होते. बैठकीत साखर कारखानदारांच्या मनमानी, उस दर न जाहीर करणे, वजन काट्यातील गैरप्रकार आणि ऊस वाहतूक व्यवस्थेतील धोकादायक प्रकार या सर्व मुद्द्यांवरून शेतकऱ्यांनी संतप्त नाराजी व्यक्त केली.





अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या खाजगी व सहकारी साखर कारखान्यांबाबत ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात झालेल्या बैठकीत सर्व खाजगी व सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी व अन्यायग्रस्त शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

बैठकीत चर्चेदरम्यान हे स्पष्ट झाले, राज्यातील आणि जिल्ह्यातील बहुतेक साखर कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३५५० रुपये प्रति टन हा केंद्र सरकारने सुचवलेला दर देण्यास टाळाटाळ करीत आहेत.

कारखान्यांचे चेअरमन किंवा एमडी स्वतः बैठकीस उपस्थित राहत नाहीत, त्याऐवजी निर्णय घेऊ न शकणाऱ्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना पाठवले जाते, अशी टीका शेतकरी प्रतिनिधींनी केली. साखर कारखान्यांकडून उसाच्या वजनात मोठ्या प्रमाणावर काटामारी होत असल्याचे आरोप करण्यात आले.

शेतकऱ्यांना आपला ऊस बाहेरील खाजगी काट्यावर वजन करून खात्री करण्यास कारखाने मनाई करतात, ज्यामुळे वजनात मोठी फसवणूक होत असल्याचे उघड झाले. तसेच, अनेक साखर कारखाने आपल्या कार्यक्षेत्रातील ऊस दुर्लक्षित करून जिल्हाबाहेरील ऊस आणतात आणि त्याचा वाहतूक खर्च स्थानिक शेतकऱ्यांच्या माथी मारतात, ज्याचा थेट फटका दरावर बसतो. FRP नुसार देयके न देणाऱ्या कारखान्यांवर कारवाई नाही – शेतकऱ्यांची खंत उस नियंत्रण आदेश १९६६ च्या तरतुदीनुसार पंधरा दिवसांच्या आत ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु जिल्ह्यातील अनेक साखर कारखाने आजपर्यंत थकीत बिलाची देयके शेतकऱ्यांना दिलेली नाहीत, तसेच त्यावर व्याजही दिलेले नाही. शेतकऱ्यांच्या वारंवार तक्रारी असूनही साखर आयुक्त आणि प्रादेशिक साखर सहसंचालकांनी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, अशी खंत शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केली. कुकडी सहकारी साखर कारखान्याने जाहीरनाम्यात प्रति टन २९११ रुपये दर दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल केली असल्याचे स्पष्ट करण्यात आले. याबाबत साखर आयुक्तांकडे तक्रार देऊनही आजवर कोणताही खुलासा झालेला नाही. साखर कारखान्यांच्या ऊस वाहतूक यंत्रणेकडून ओव्हरलोड व मॉडिफाइड वाहने रस्त्यावर धावत असल्यामुळे दरवर्षी शेकडो अपघात होऊन निष्पाप नागरिकांचे प्राण जात आहेत.

या धोकादायक ऊस वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात परिवहन व पोलिस विभाग अपयशी ठरले आहेत, असा आरोप बैठकीत करण्यात आला. गेल्या २० वर्षांपासून ऊस वाहतुकीचा दर वाढवण्यात आलेला नसल्याने वाहतूकदार ओव्हरलोड वाहतूक करण्यास भाग पडतात. परिणामी अपघातांची संख्या वाढत आहे. तसेच ऊस तोडणीसाठी ठेकेदार शेतकऱ्यांकडून अवैधरित्या प्रति एकर १० ते १५ हजार रुपये आणि वाहन ड्रायव्हरकडून अतिरिक्त शुल्क आकारतात, हेही गंभीर गैरप्रकार थांबवण्याची मागणी करण्यात आली अन्यथा १७ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक्काम आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना शिंदे गटाचे अभिजीत पोटे यांनी दिला आहे तसेच जर १६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सर्व साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले व्याजासह जमा केली नाहीत आणि केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रतिटन ३५५० रुपये भाव जाहीर करावा व कुकडी साखर कारखान्याने थकीत असणारे शेतकऱ्यांचे ७११ रुपये प्रति टन पेमेंट द्यावे अन्यथा १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आम्ही हजारो ऊस उत्पादक शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालय व आरजेडी कार्यालयावर मुक्काम आंदोलन करणार असून यामध्ये शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, शेतकरी प्रतिनिधी आणि अन्यायग्रस्त ऊस उत्पादक शेतकरी या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती अभिजीत पोटे यांनी दिली.

यावेळी साखर संघाच्या मिटींगला कृष्णा सातपुते, संजय वाघ, महादेव आव्हाड, बाळासाहेब कदम, सोमनाथ गरजे, बाळासाहेब कराळे, प्रशांत कराळे, शरद वाळुंज, युसुफ पठाण, बाळासाहेब पेरणे, रोहन साळवे, सचिन तांबे, चावरे आदींसह कुकडी कारखान्याचे थकलेले पेमेंट असणारे शेतकरी तसेच शिवसैनिक उपस्थित होते.



दुचाक्या चोरणाऱ्यासमवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

## दुचाक्या चोरणाऱ्याला पकडले

नगर – शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या दुचाकी चोरीच्या घटनांवर कोतवाली पोलिसांनी कारवाई करत एक सराईत चोरटा गजाआड केला आहे. अदित्य बाळू उबाळे (वय २६ रा. रामवाडी, सर्जेपुरा, अहिल्यानगर) असे त्याचे नाव असून त्याच्या ताब्यातून चार दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथक पेट्रोलिंग करत असताना माळीवाडा येथील इंपिरियल चौकाजवळ एक संशयास्पद इसम रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांच्या आसपास विनाकारण फिरत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याची विचारपूस केली असता त्याने आपले नाव अदित्य बाळू उबाळे असे सांगितले. चौकशीअंती त्याच्याकडे दुचाकी चोरीविषयी विचारणा केली असता त्याने कबुली दिली की, तो सध्या कोणतेही कामधंदे करत नसल्याने दारू व मौजमजेसाठी पैसे मिळविण्यासाठी शहरातील विविध भागांतून दुचाकी चोरी करत असल्याचे सांगितले. तपास अधिक खोलात गेल्यावर त्याने चोरी केलेल्या दुचाकी आपल्या घराजवळ लपवून ठेवल्याचे उघड केले. पंचासमक्ष पोलिसांनी त्याच्या कडून चार दुचाकी ताब्यात घेतल्या.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गणेश देशमुख, पोलिस अंमलदार दौंड, वासिम पठाण, शाबीर शेख, विशाल दळवी, विनोद बोरगे, वाघचौरे, दीपक रोहकले, सत्यम शिंदे, अभय कदम, अमोल गाढे, सचिन लोळगे, सुरज कदम, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, अतुल काजळे, राम हंडाळ, राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

# मुंबई सायबर पोलिसांच्या नावाने अभियंत्याला केली डिजिटल अरेस्ट

### फोन करून मनी लाँड्रींग केसची धमकी देत ८ लाख ८० हजार रुपये लुबाडले

नगर – शहरातील एका सिव्हील इंजिनियरला मुंबई सायबर सेलच्या नावाने फोन करून तुम्ही कुरियरने अवैध पार्सल पाठविले असून मनी लाँड्रींग, हवाला केस मध्ये डिजीटल अरेस्ट झाली आहे. असे सांगत त्यांच्या बँक खात्यातून ८ लाख ८० हजार रुपये पाठविण्यास भाग पाडत फसवणूक केल्याची घटना २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० या कालावधीत घडली.

याबाबत फसवणूक झालेल्या अभियंत्याने ३१ ऑक्टोबर रोजी नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी यांना २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या राज आनंद नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने आपण ब्लु डार्ट कुरियर मधून बोलत असून तुम्ही कुरियरने अवैध पार्सल पाठविले आहे. त्यामुळे तुम्ही मुंबई सायबर सेलच्या अधिकाऱ्यांशी बोला असे म्हणत एक नंबर पाठविला. त्या नंबर वर फिर्यादीने व्हाट्स ॲपवर व्हिडीओ कॉल केला असता तो विजय पाल या नावाच्या व्यक्तीने उचलला.

त्याने फिर्यादीला तुम्ही अवैध पार्सल पाठविल्याने तुम्हाला मनी लाँड्रींग, हवाला मनी थेप्ट प्रकरणात डिजीटल अरेस्ट झाली आहे. तुमचे सर्व बँक डिटेल्स सांगा असे विचारले. फिर्यादीने आपले कान्हूर पठार मल्टीस्टेट सोसायटीत बचत खाते असून त्यात ८ लाख ८० हजार रुपये आहेत असे सांगितले. त्यानंतर त्या व्यक्तीने त्यांना एक बँक खाते सांगून त्यावर तुमचे खात्यातील सर्व पैसे ऑनलाईन पाठवा. तुमच्या सर्व बँक खात्यांची चौकशी पूर्ण झाल्यावर ते तुम्हांला परत मिळतील असे सांगून कुमार एजन्सी, बंधन बँक बलरामपुर या खात्यावर ८ लाख ८० हजार रुपये पाठविण्यास भाग पाडले. फिर्यादी हे घाबरून गेलेले असल्याने त्यांनी पैसे पाठविले.

त्यानंतर आपली सायबर भामट्यांनी आर्थिक फसवणूक केल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी ३१ ऑक्टोबर रोजी नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा जणांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३३६ (३), ३४० (२) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो.नि. मोरेश्वर पेंदाम हे करत आहेत.

## सराईत गुन्हेगार जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार

नगर – शहरात हत्याराचा धाक दाखवून दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर कोतवाली पोलिसांनी कठोर कारवाई करत त्यास जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार केले आहे. बाबा ऊर्फ राजेश गोलसिंग टाक (वय २६, रा. काटवण खंडोबा, अहिल्यानगर) असे त्याचे नाव आहे.

बाबा टाक हा दीर्घकाळापासून गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून, तो शहरात हत्याराचा धाक दाखवून लोकांना मारहाण करणे, जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे आणि नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे अशा कृत्यांमध्ये सक्रिय होता. त्याच्या विरोधात कोतवाली पोलीस ठाण्यातून हद्दपारीचा प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी, नगर शहर भाग यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मान्यता देत उपविभागीय दंडाधिकारी यांनी बाबा टाक यास अहिल्यानगर जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले. त्यानुसार कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या आदेशान्वये गुन्हे शोध पथकातील अंमलदारांनी कारवाई करून त्याचा शोध घेतला व त्याला ताब्यात घेत त्याची हद्दपारीची प्रक्रिया पूर्ण केली.




महाराष्ट्र राज्य मोबाईल टॉवर टेक्निकल एम्प्लॉइज असोसिएशनच्या वतीने राज्यातील सर्व मोबाईल टॉवर तांत्रिक कर्मचाऱ्यांनी पगारवाढ, बोनस आणि सुट्ट्यांच्या वेतनाची मागणी करत अहिल्यानगर – छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील शेंडी बायपास येथे रस्ता रोको आंदोलन केले.

# मोबाईल टॉवर कर्मचाऱ्यांची पेमेंट वाढ व सुट्ट्यांचे वेतन त्वरित द्यावे

### रस्ता रोको करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; मागण्या मान्य न झाल्यास कामबंद आंदोलन करणार; परिणामी नेटवर्कचा त्रास होण्याची शक्यता

नगर – महाराष्ट्र राज्य मोबाईल टॉवर टेक्निकल एम्प्लॉइज असोसिएशनच्या वतीने राज्यातील सर्व मोबाईल टॉवर तांत्रिक कर्मचाऱ्यांनी पगारवाढ, बोनस आणि सुट्ट्यांच्या वेतनाची मागणी करत अहिल्यानगर – छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील शेंडी बायपास येथे रस्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष सदाशिव खेडेकर, उपाध्यक्ष किशोर साठवणे, सचिव समीर शेख, कायदेशीर सल्लागार ॲड. श्रीरंग गिते, तसेच सोपान शिंदे, रवी काकडे, बाबासाहेब गायकवाड, शामसुंदर जाधव, अश्फाक शेख, नारायण पाटील, किरण निकम आदी पदाधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

असोसिएशनच्या मते, अल्टीअस, पीटीपीएल, आयडिया इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीसह विविध मोबाईल टॉवर कंपन्यांमध्ये कार्यरत तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांना मागील काही महिन्यांपासून योग्य पगारवाढ देण्यात आलेली नाही. उलट, कामाच्या वाढत्या ताणामुळे आणि महागाईच्या पार्श्वभूमीवर दरमहा ५०० ते ६००० रुपयांपर्यंत कपात करण्यात आली आहे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. तसेच वर्ष २०२५ मधील सर्व रजा व राष्ट्रीय सुट्ट्यांचे सुमारे ११,४०० रुपयांचे वेतन अद्याप कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले नाही, अशी माहिती संघटनेकडून देण्यात आली. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिवाळीपूर्वी बोनस आणि सुट्टीचे पैसे देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, ते अद्याप दिलेले नसल्याने कामगारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, जर मागण्या लवकरात लवकर मान्य केल्या नाहीत तर राज्यभरातील सर्व मोबाईल टॉवर कर्मचारी कामबंद आंदोलन करतील, ज्याचा थेट परिणाम नागरिकांच्या मोबाईल नेटवर्कवर होणार आहे. पुणे लेबर कमिशनर यांच्या हस्तक्षेपानंतरही संबंधित कंपन्यांनी मागण्या न मानल्यामुळे आता असोसिएशनकडून सर्व जिल्ह्यांत तीव्र आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

संघटनेचे अध्यक्ष सदाशिव खेडेकर म्हणाले, आमच्या मागण्या कायदेशीर आणि न्याय्य आहेत. कर्मचाऱ्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळेपर्यंत आंदोलन सुरू राहील. कंपनीने लवकरात लवकर थकबाकी व पेमेंटवाढ अमलात आणावी अन्यथा महाराष्ट्रभर नेटवर्क सेवांवर परिणाम होणार.

## अक्षय आनंदकर यांचे अपघाती निधन



नगर – सारसनगर येथील कपिलेश्वर कॉलनी येथील अक्षय जनकराज आनंदकर (वय २८) यांचे ३१ ऑक्टोबर रोजी पुणे येथे अपघाती निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे आई, २ बहिणी, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे.

## तप्ताबाई खांदवे यांचे दुःखद निधन

नगर – येथील तप्ताबाई खांदवे (वय ९०) यांचे वृद्धकाळाने निधन झाले. त्या नानी नावाने ओळखल्या जात होत्या. त्या अत्यंत धार्मिक वृत्ती व मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. शेतकरी तात्याराम खांदवे यांच्या मातोश्री तर सांडवे गावचे सरपंच प्रवीण उर्फ बाप्पू यांच्या त्या आजी होत. त्यांच्यामागे दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज खा पपईच्या बिया

पपईच्या बिया खाणे अनेक प्रकारे आरोग्यासाठी फायद्याचे आहे. पपईच्या बियांमध्ये फायबर, निरोगी फॅटी ऍसिडस् आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे वजन कमी करण्यास, पचन सुधारण्यास, आणि रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास मदत करतात. पपईच्या बिया खाल्ल्याने शरीरातील चरबी जाळण्यास मदत होते आणि वजन कमी करण्यास मदत होते. बियांमध्ये फायबर जास्त असल्याने पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता कमी होते. रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण मिळविता येते. पपईच्या बिया रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करतात. बियांमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. पपईच्या बिया त्वचेसाठी देखील फायद्याच्या असतात, त्या त्वचेला उजळ करतात आणि वृद्धत्वाला प्रतिबंध करतात.

## पाककला

### अमृतसरी छोले

**साहित्य :** ३०० ग्रॅम काबुली चणे, २५० मी.ली थोडे पाणी, वेलची, २ चम्मच डाळिंबाचे दाणे, १/२ टीस्पून आंबा पावडर, १ टीस्पून आले लसूण पेस्ट, ४ हिरव्या मिरच्या, चवीनुसार मीठ, अर्धा टीस्पून धने पावडर, १/२ टीस्पून लाल तिखट, १ टीस्पून हळद, १/२ टीस्पून गरम मसाला, १ ते १/२ कप पाणी, २ चम्मच तूप गरम, २ कांदे, २ तमालपत्र, २ टोमॅटो,

**कृती :** सर्वप्रथम भिजवलेले चणे (८-१० तास) काढून चांगले धुवावेत. पुन्हा काढून टाका आणि एका खोल पॅनमध्ये स्थानांतरित करा. थोडे पाणी आणि वेलची घाला. मध्यम आचेवर ठेवा आणि चणे पुरेसे मऊ होईपर्यंत ३० ते ४० मिनिटे उकळवा. सुमारे २ ते ३ कप पाणी राखून चणे पुन्हा काढून टाका. डाळिंबाचे दाणे, आंबा पावडर, आले लसूण पेस्ट, हिरव्या मिरच्या, मीठ, धने पावडर, लाल तिखट, हळद आणि गरम मसाला पावडर ब्लेंडरमध्ये एकत्र करा. हे सर्व साहित्य एकत्र बारीक करून घ्या. सुमारे १ ते ११/२ कप पाणी घाला आणि गुळगुळीत पेस्टमध्ये मिसळा. नंतर मध्यम आचेवर पॅन गरम करा. चणे आणि ग्राउंड पेस्ट घाला. नीट मिक्स करून बाजूला ठेवा. एका छोट्या फ्राईंग पॅनमध्ये तूप गरम करा. कांदे सोनेरी तपकिरी होईपर्यंत कांदे आणि तमालपत्र परतून घ्या. टोमॅटो घालून चांगले परता. राखीव पाण्यासोबत हे चण्यामध्ये घाला. एक उकळी आणा आणि ग्रेव्हीमध्ये थोडेसे पाणी येईपर्यंत शिजवा. चिरलेल्या कांदे कोथिंबीरीसोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### घरात येतात का काळ्या मुंग्या?

* घरात काळ्या मुंग्यांचे आगमन हे धन, आनंद आणि समृद्धीचे लक्षण आहे. शास्त्रांनुसार, जर घरात पूर्वेकडे मुंग्या अन्न घेऊन जाताना दिसल्या तर येणाऱ्या काळात धनलाभ होण्याचे संकेत आहेत.

* तुम्ही कदाचित लक्षात घेतले असेल की काही लोक पैशाचा ओघ वाढवण्यासाठी त्यांच्या घराच्या उत्तर दिशेला धातू किंवा स्फटिकाचा कासव ठेवतात.

## सल्ला

जर प्रेशर कुकरचा रबर थोडा सैल झाला असेल तर पिठाचा गोळा बनवा आणि तो झाकणाभोवती ठेवा. नंतर झाकण बंद करा आणि दाब वाढेपर्यंत धरून ठेवा.

## सौंदर्य

लिंबाच्या रसात मध मिसळून मानेवर लावा. २० मिनिटांनंतर कोमट पाण्याने मान धुवा. हा उपाय आठवड्यातून दोनदा केल्याने मान स्वच्छ होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५

**भागवत एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, पू.भा.१७|०४, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. कोणत्याही प्रकारचे जोखिम अंगलट येईल. विवाहेच्छूकांचे विवाह जमतील.

**वृषभ :** जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे. दिवस कालच्या इतका सुखद जाणार नाही.

**मिथुन :** धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये स्थिती अनुकूल राहिल. सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**कर्क :** वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. पत्नीपासून सुख मिळेल. जुन्या मित्रांचा सहवास लाभेल.

**सिंह :** गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल.

**कन्या :** व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**तूळ :** आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल.

**वृश्चिक :** सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होईल. वैवाहिक सुख वाढेल.

**धनु :** एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल मात्र शत्रू प्रभावहीन पडतील. व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल.

**मकर :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**कुंभ :** आपला निष्काळजी दृष्टीकोण आज चांगला ठरणार नाही. व्यापारात मोठे नुकसान होईल.

**मीन :** घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील. उधारी उसनवारी वसुल होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२९४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | | | ■ |
| | ■ | ४ | | ■ | ■ | ■ | ५ |
| ■ | ६ | | ■ | ७ | ८ | ९ | |
| १० | ■ | ११ | १२ | | | | |
| | ■ | १३ | | | | ■ | ■ |
| १४ | | | ■ | | ■ | १५ | १६ |
| | ■ | १७ | १८ | ■ | १९ | | |
| | ■ | २० | | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री ४) माज; गुर्मी; हत्तीच्या गंडस्थळातील स्त्राव ६) ताडकन फुटणारी एक वस्तू ७) हातपाय पसरून; सर्व अंग टेकून ११) ज्याला काही कामधंदा नाही व जो नुसता बसून आहे असा १३) सप्त पातालांपैकी एक १४) मुस्लीम स्त्रीचे एक नाव १५) एक पक्षी; कावळा; वायस; काग १७) मोठी नदी १९) समोरासमोरची लढाई २०) सांगता; समाप्ती; शेवट; अखेर

### शब्दगंध क्र. ७२९३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | मा | भा | र | ती | ■ | सा | त |
| श | ळ | ग | ■ | र | सा | व | न |
| ने | क | ■ | सं | क | ल | क | ■ |
| पा | ■ | उ | प | मा | ■ | ल | य |
| स | पी | ट | ■ | न | ग | ■ | व |
| ने | ■ | क्र | | ■ | र | ग | त |
| ■ | अ | मं | व | ल | ■ | र | मा |
| क | वा | ड | ■ | त | ळ | म | ळ |

**उभे शब्द :-** १) पाठ; मागची बाजू; वरचा भाग; पुस्तकाचे पान २) संत तुलसीदासांचे रामायण या नावाने ओळखले जाते ३) कथिल व शिसे यांचा मिश्र धातू ५) एक वनस्पती तूप ७) उंचसखल नसलेले; सपाट ८) एक गुजराती आडनाव ९) ऊब; आच १०) अगदी सारखे; तुल्य १२) दहीहंडीतील विविध पदार्थांचे मिश्रण १५) काज; कार्य १६) पडदा; कापडी भिंत १८) एक श्वासरोग १९) छोटा; लहान; लघू; बारीक

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** तुम्ही बरोबर योग्य असाल तर काहीच सिद्ध करण्याचा प्रयत्न करू नका फक्त योग्य वेळेची वाट पहा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'मान्सून' कशाला म्हणतात?

'मान्सून' हा शब्द 'मौसम' या अरबी शब्दावरून अस्तित्वात आला आहे. मौसम म्हणजे ऋतू. आग्नेय आणि दक्षिण आशियाई देशांत, म्हणजे भारत आणि भारताच्या पूर्वेस असलेल्या देशांत पाऊस ठराविक ऋतूत पडतो. या देशांत उन्हाळ्याच्या अखेरच्या भागात समुद्राकडून जमिनीकडे वारे वाहतात. तर हिवाळ्यात जमिनीवरून समुद्राकडे वारे वाहतात. समुद्राकडून जमिनीकडे वाहणारे वारे या देशांत जून ते सप्टेंबर या काळात मोसमी पाऊस आणतात. हाच तो मान्सून. उन्हाळ्याच्या सुरुवातीला जमीन तापायला सुरवात होते.

जमीन पाण्यापेक्षा लवकर तापते नि थंड होते. सततच्या उन्हामुळे आशिया खंडातला हा भूभाग प्रचंड तापतो आणि इथे या भूभागावर कमी दाबाचा पट्टा निर्माण होतो.

साहजिकच समुद्राकडून जमिनीकडे वारे वाहू लागतात. हे नैर्ऋत्य मान्सून वारे. हिवाळ्यात जमीन थंड होत जाते तर पाणी उबदारच राहते. यामुळे जमिनीकडून सागराकडे वारे वाहतात. हिमालयाला अडलेले ढग या वाऱ्यांबरोबर परत फिरतात. याला ईशान्य मान्सून म्हणतात.

### असमाधान

थंडीच्या दिवसात, एक गाढवास असे वाटेल की, उघडी हवा आणि वाळलेला कडवा यांच्या ऐवजी थोडीशी उष्णता आणि घासभर ताजे गवत आपणास मिळेल तर फार चांगले होईल.

ही त्याची इच्छा लवकरच पूर्ण झाली परंतु त्याबरोबरच त्याचे कामही वाढले व त्यामुळे त्याला हिवाळ्याप्रमाणेच उन्हाळ्याचाही कंटाळ येऊ लागला. आता पावसाळा येईल तर चांगले, असे त्याला वाटू लागले.

लवकरच पावसाळा आला व पुढे येणाऱ्या हिवाळ्यासाठी लागणारे सामान वाहून नेण्याचे श्रम त्याला पडू लागले.

शेवटी, आता हिवाळा येईल तर चांगला असे त्याला वाटू लागले.

तात्पर्य : अतृप्त व्यक्तीचे समाधान क्वचितच होतो.

## रहमते दर्शन (भाग - १)



### उन्होंने अपनी रहमत से मुझे बुलाया

बारे में बताया और कहा, किसी से कुछ भी लोगे, तो वह तुम्हें वापिस देना पड़ेगा, हो सकता है यह कर्ज़ा उतारने के लिए तुम्हें दूसरा जन्म भी लेना पड़े। इन वाक्यों को सुनते ही मैं बेचैन हो उठी क्योंकि मैं घर-घर जाकर सफ़ाई का काम करती हूँ और मुझे लोग कुछ न कुछ देते ही रहते हैं। मुझे लगा कि महाराज जी के कथनानुसार मुझे कर्जा उतारने के लिए वापिस जन्म लेना पड़ेगा। मैं थर्रा उठी और मैंने महाराज जी से मिलने का निश्चय कर लिया क्योंकि फिर कभी मिलने का मौका मिले या नहीं मिले।

सत्संग समाप्त होते ही मैं स्टेज की ओर बढ़ी ताकि महाराज जी से बात कर सकूँ। पास आकर मैंने प्रार्थना की, महाराज जी! मैं तो अछूत जाति की हूँ। मुझे घर-घर जाकर सफाई वगैरह करनी पड़ती है। लोग मुझे कुछ न कुछ देते रहते हैं। तो उनका कर्ज़ चुकाने के लिऐ क्या मुझे फिर जन्म लेना पड़ेगा?

मेरी समझ में कुछ नहीं आ रहा है, क्या करूँ? इतना सुनते ही महाराज जी ने मुझे प्यार भरा आशीर्वाद दिया और जैसे माँ बच्चे की अटपटी बात सुनकर उसे छाती से लगा लेती है, मुझे भी ऐसा ही अनुभव हुआ। महाराज जी ने अपनी पवित्र वाणी से मुझे समझाया और कहा, अरी बावरी,

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अनाहत चक्र

चाहे कैसी भी परिस्थिति हो अगर हम मन में स्नेह का भाव रखें तो देर सवेर विजय हमारी ही होगी। प्रेम के संकल्पों में चुम्बकीय बल होता है। ये संकल्प अपने आस पास के वातावरण पर प्रभाव डालते हैं। सब व्यक्ति व प्रकृति के पदार्थ उसकी तरफ खींचे चले आते हैं। जब हम प्यार के संकल्प मन में रखते हैं तो उनसे विटामिन वा मिनरल आदि बनने लगते हैं जो खून में मिल जाते हैं और जहां उनकी जरूरत होती हैं उस अंग को शक्तिशाली बना देते हैं। जब हम प्रेम के संकल्प करते हैं तो यह संकल्प सूक्ष्म कीटाणु बन जाते हैं जो हर प्रकार के बुरे कीटाणुओं को खा जाते हैं। कैंसर आदि के रोगाणु भी खत्म हो जाते हैं।

प्रेम के संकल्प एक टानिक का काम भी करते हैं। ऐसे शक्तिशाली टानिक दुनिया के किसी भी पदार्थ से प्राप्त नहीं होते। प्रेम के संकल्पों से ऐसा बल पैदा होता है जिस से हमारे पाप कर्म भस्म हो जाते हैं और सूक्ष्म शरीर शुद्ध हो जाता है। प्रेम के संकल्पों से हमारे में दिव्य गुण अपने आप आने लगते हैं और हम सर्व गुण सम्पन्न १६ कला सम्पूर्ण बन जाते हैं। मन से आलस्य, अलबेलापन, बहानेबाजी के सूक्ष्म विकार खत्म हो जाते हैं। स्नेह के संकल्पों से ऐसा बल उत्पन्न होता है जिस से हम

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - लेकीची दिवाळी....

दरवर्षीप्रमाणे तो आणि त्याची पत्नी दोघेही आले खेड्यात दिवाळी साजरी करण्यासाठी. खरं तर तिला म नापासून वाटायचं की आपली दिवाळी, आपल्याच शहरात व्हावी. पण तिचा नाईलाज. हे त्याच्याही लक्षात यायचं. तो तिला समजवायचा. माझे आई, वडील आहेत तोपर्यंत इथं दिवाळीला यावंच लागेल नव्हे येऊच आपण. ती, त्याच्या शेजारील सीटवर बसायची. त्यांची फोरव्हिलर खेड्याकडे निघायची. खेड्यातल्या त्या साध्याशा घरात आलं की तिचा चेहरा बरंच काही सांगायचा प्रयत्न करायचा, हे, तिच्या सासऱ्याने ओळखलेलं. पण सणासुदीच्या काळात बोलणं योग्य नाही म्हणून ते गप्प राहायचे. ह्यावर्षीही त्यांनी, दोघांना शेतावर नेलं. पिकं छान डोलताहेत. वाऱ्याची हवीहवीशी गार झुळुक तन, मनाला स्पर्श करते आहे. तो, तिच्याशी बोलत असतांना ती फक्त होकारार्थी अथवा नकारार्थी मान हलवायची. त्याची आई, जेवण घेऊन शेतावर आली.

झाडाखाली चौघांनी जेवण केलं. खरं तर तिला अगदी मनापासून झाडाखाली बसुन जेवलेलं आवडत पण तिने तसं काहीही दाखवलं नाही. बाप म्हणाला, पोरा, म्होर्ल्या वर्षापास्नं तुमी तुमाच्याच घरात दिवाळी करत जा. मुलाने आश्चर्याने बापाकडं पाहिलं. का? मुलाने विचारलंच. आमची लेक हिथं दिवाळसणाला आली की लईच कमी बोल्तीया. ती लगेचच म्हणाली,तसं काही नाही. थोडीशी तब्येत नरम गरम आहे म्हणून कमी बोलते. सासरे म्हणाले, शेतामध्ये झाडाखाली जेवणाराची तब्येत नेहमीच ठणठणीत राहाते. काळजी करु नकोस. आता हिथं आलीसना तब्येत झ्याक व्हईल. तिने होकारार्थी मान हलवली. पोरी, ह्या आपल्या काळ्या आईसाठी आमी दोघंबी हितं हातुया. आमी दोघंबी तुमच्या घरात ऱ्हायला लाग्लो तर ह्या काळ्या आईचं काय? सुन म्हणाली बरोबरच आहे तुमचं. सासरे म्हणाले, मप्ल्याला जलम धिला ती आई आण ही काळी आई माह्यासाठी समदं हाये. एक परस्न इचारु का? ह्या अनपेक्षित प्रश्नाने ती गोंधळली. 'विचारांना' स्वतःला सावरत ती म्हणाली, ही समदी शेती इकुन आमी दोघंबी येतो तुमच्या घरात हायाला. उत्तराने ती किंचितसी थरथरली. हो. याना. ती म्हणाली. आई, दादा खरंच चलाना आमच्या घरी राहायला. मुलगा म्हणाला. नाय पोरा, आमी हिथच हातो. आन आता तुमीबी हिथंच हा दोघंबी कायमचं. काही क्षण शांतता पसरली. आता हे कसं शक्य आहे? मुलाने विचारलं. हो. मला सुध्दा शक्य वाटत नाही. ती नाराजीनेच म्हणाली.

आता मात्र बाप मोठ्याने हसला, म्हणाला,गंमत केलीया म्या तुमची. तिची सासुसुध्दा मोठ्याने हसायला लागली. दादा, नोकरीमुळं शहरात राहावं लागतंय. ' म ुलगा म्हणाला. बाप म्हणाला, हे आम्हास्नीबी म्हाईत हाये. पण आमी हाये तवर यत जा आमास्नी भेटाया. मुलगा, मुलगी भेटल्याचा आनंद लई व्हतोया आमास्नी. पोरा, तुप्ली आई तुमच्या दोगांचा लई इचार करतीया. शेतातबी राबतीया. बाप मोठमोठ्याने रडु लागला. आईचेही डोळे पानावले. मुलाने दोघांचीही आसवं पुसली. म्हणाला, आम्ही दोघंही दरवर्षी दिवाळीला नक्की येऊ. आई म्हणाली, पोरी, म्हागल्या तीन वर्षापास्नं आमी दोघंबी बघतोया तु हिथं दिवाळीला आली की आमच्यासंग फार बोलत न्हाईस आमची मुलगी अस्ती तर ती अशी वागती नसती. तु का गप्प होतीस. घडा घडा बोलना. आगं दिवाळी हे फकस्त निमित्त हाये आपली भेट व्हायाचं. रोज भाकरच खातो पण करंज्या, चकल्या, लाडु दिवाळीलाच खात्यात.

सासरा म्हणाला, पोरी, आपलं हितलं घर साधं हाये पण लई पिरेम हाये ह्या घरात रातच्याला दाराम्होरं लावल्याली पणती लहान अस्तीया पण ज्यो उजेड देतीना त्याला तोड न्हाई. करंज्या, लाडवातला गॉडपणा आपल्या जिभेवर हयाला पायजे म्हंजी चारमान्सं तुमच्या सोबत बोलत्यात. आकाशकंदिलातला बलप उजेड देत न्हायाला पायजे तरच आकाशकंदिल चांगला दिस्तोया. दारा म्होरची रांगोळी किती म्होटी, रंगीत हायेका न्हाई हे महत्वाचं न्हाई तुमी ती रांगोळी किती मन लाऊन काढली ते मत्वाचं हाये. नव्या कपड्यात माणूस लई झॅक दिस्तोया तसा त्यो मनानीबी झॅक आसाया पायजे तर त्या दिवाळीला अर्थ हाये. तुला आणखीन एक परस्न इचारतो. आमी दोघंबी खरंच तुहे आईबाप अस्तो तरीबी तू आमच्याशी बोलली नस्तीका? आता मात्र ती शहारली. आसवं गालावर आल्याचंसुध्दा तिला कळलं नाही. ती ऊठली. दोघांच्याही पाया पडली. सासुच्या गळ्यात पडुन मनसोक्त रडली.

त्याचवेळी झाडावरंच पिकलं पान तिच्या डोक्यावर पडलं. सासुने ते पान उचलुन तिच्या हातावर ठेवलं. म्हणाली, हे पान जपुन ठेव. हे पान परत झाडाला लावता येणार न्हाई पण तुला जपुन ठेवता येईल. सासुबाईचं बोलणं तिच्या लक्षात आलं. दोन्ही हात जोडुन ती म्हणाली, दादा, आई मला माफ करा. मी शहरात जन्मले, वाढले. खेड्यात कधीच आले नव्हते. म्हणून खेडं म्हंटली की मी नकारात्मक व्हायचे. मी नाखुशीनेच मागचे दोन्हीही वर्ष आले पण आता मी ह्यावर्षीपासुन आनंदाने आपल्या घरी येईल. खरंच तुम्ही माझे सासु, सासरे नाहीत. आई, वडिल आहात. त्या दोघांच्या चेहऱ्यावरचा आनंद ते झाड आणि काळी आई पाहात आहे.

(लेख क्र.५७३)

**- सुनील राऊत**

माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर

मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगी : काय करतोयेस?
मुलगा : शेंगा खातोय?
मुलगी : एकटा एकटाच
मुलगा : दहा रुपयाच्या शेंगांमध्ये काय भंडारा घालू का मग?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* हरितसेना कशाशी संबंधित आहे?

- वनीकरण, पर्यावरण, शेती

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### पंचेंद्रियांचा विकास

**३) एक वर्ष ते तीन वर्षे :** या वयातील मुलांच्या पंचेद्रियांचा विकास होऊन मेंदूला चालना मिळण्यासाठी वेगवेगळ्या आकारांची, रंगांची खेळणी बाळाला द्यावी. दीड ते दोन वर्षांची मुलगी बाहली, प्राणी, पक्षी अशा खेळण्यांबरोबर जास्त खेळते; तर मुलगा मोटारगाडी, चेंडू, विमान या खेळण्यांबरोबर जास्त खेळतो. या वयातील बाळांना कार्टूनची चित्रे असणारी पुस्तके बघण्यास द्यावीत. या वयातील मुलांना वाचता येत नाही. परंतु पुस्तकातील चित्र बघून ते संदर्भ लावू शकतात व आपण बाळाचा मानसिक व बौद्धिक विकास चांगल्या प्रकारे करू शकतो. याबद्दलचे सखोल माहिती आपण बाळाची खेळणी या प्रकरणात आपण पाहिली आहे. बाळाचे आरोग्य सुदृढ व्हावे व त्याची शारीरिक व मानसिक वाढ चांगली व्हावी, म्हणून 'दुर्वांकुर बालप्राश' अर्धा-अर्धा चमचा सकाळ-संध्याकाळ द्यावा.

**४) तीन वर्षे ते सहा वर्षे** - या काळात आपण बाळाच्या मेंदूचा विकास जास्तीत जास्त होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, कारण एका शास्त्रज्ञाने म्हटले आहे, की बाळाच्या मेंदूचा विकास हा जास्तीत जास्त सहा वर्षापर्यंत होत असतो. त्यामुळे या वयात जेवढे काही संस्कार केले जातील, त्याचा पुढील आयुष्यामध्ये चांगलाच उपयोग होतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-म्हांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# घर बांधताय ! खालील गोष्टींची अवश्य काळजी घ्या

आज आपला भारत देश हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा विकसनशील देश आहे आणि या वेगा मागील महत्वाचा कणा हे बांधकाम क्षेत्र आहे.

आज भारतातील प्रत्येक व्यक्ती या बांधकाम क्षेत्राशी काही ना काही कारणाने जोडलेला आहे. त्यामुळे बांधकाम क्षेत्राचे महत्वजाणूनयोग्य बांधकाम पद्धतीविषयी काही महत्वाच्या गोष्टींची माहिती असणे गरजेचे आहे.

आज योग्य बांधकाम पद्धतीची उणीव ही जास्त करून घर बांधकामादरम्यान दिसून येते. घर बांधकामास सुरुवात करण्या अगोदर इंजिनिअर कडून घराचा प्लॅन व स्टील डिझाईन घेऊन त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होते.








**१) लाईनआऊट –** एखाद्या इमारतीचे लाईन आऊट करताना प्लॉटचे चारही कोपरे हे 90Amo अंशामध्ये चेक केल्या नंतरहीमधील डायगोनल लाईन देखील प्लॅननुसार बरोबर असल्याचे क्रॉस चेक करणे गरजेचे आहे.

बऱ्याच वेळा घराच्या लाईनआउट वेळी असणारा काटकोनतील थोडाफार फरक हा लांब अंतरामुळे भरपूर मोठा फरक आणू शकतो त्यामुळे डायगोनल देखील प्लॅन नुसार बरोबर असल्याचे क्रॉस चेक करणे गरजेचे आहे.

**२) घराचा पाया–** घराच्या पायाचा खड्डा हा कडक जमीन येईपर्यंत (हार्ड मुरूम) खोदावा.

खड्ड्याची खोली ही कमीत कमी ४ फूट असावी.

काळ्या, धर नसलेल्या, पाणीसाठ्या जवळील जमीन वरपाया घेण्यासाठी राफ्ट फाउंडेशन, पाईल फौंडेशन अथवा सोलिंग करून फौंडेशन अशा प्रकारे पाया घेतले जातात याकरिता इंजिनीअरचे मार्गदर्शन घेऊनच काम करणे गरजेचे आहे.

**३) पायाची पिसीसी –** पायाची पीसीसीची जाडी ही कमीत कमी ३ असावी. त्यासोबतच पी सीसी ही योग्य ठिकाणी व लेव्हलमध्ये असायला हवी. पी सी सीची काँक्रेट क्वालिटी ही आय एस कोड नुसारच १५ कमीत कमी असायला हवी.

**४) फौंडेशन –** घराचे फौंडेशन जाळीला कव्हर ब्लॉक लावणे अत्त्यावश्यक आहे. काँक्रिटिंगचे कामकरताना पाण्याचे योग्य प्रमाण असणे गरजेचे आहे. ज्याप्रकारे डिंकामध्ये पाणी टाकल्यानंतर त्याचा चिकटपणा कमी होत जातो, त्याचप्रमाणे काँक्रेटमध्ये देखील अधिक पाणी झाल्यास त्याची ताकत कमी कमी होत जाते.

काँक्रेटचा माल हा चांगला एकजीव व लोण्याच्या गोळ्या सारखा असावा. फौंडेशनचे किंवा कोणत्याही काँक्रेटचे काम करताना मटेरियल हे अंदाजे न टाकता त्याचे मिक्स डिसाईननुसार प्रमाण करूनच काँक्रेटिंग करावे.

आज अदानी सिमेंट कंपनीमार्फत आपण आपल्या कस्टमर करीता ही सेवा मोफत उपलब्ध करून दिलेली आहे यामध्ये ३०मिनिटामध्ये साईटवर असलेल्या मटेरियलची टेस्टिंग करून लगेच योग्य प्रमाणाचा रिपोर्ट दिला जातो.

**५) कॉलम –** कॉलमचे मेन स्टील बार कमीत कमी १२ mm असावे. रिंग बांधताना त्याच्या शेवटच्या एन्डचा कोण हा 90Amo न ठेवता अजून बेंड करून 135 Amo ठेवावा.

कॉलममध्ये देखील कव्हर ब्लॉक वापरावेत.

कॉलमचे काँक्रेटिंग करताना काँक्रेट हे ३ फूट पेक्षा जास्त उंचीवरून न पडेल याची काळजी घ्यावी.

तसेच कॉलम भरताना व्हायब्रेटर निश्चित वापरावा.

**६) स्लॅब –** स्लॅबच–बीमचे स्टील हे डिझाईननुसार असावे.

कॉलमला वरील मजल्यासाठी योग्य लॅप लेंथ दिली गेली आहे का हे तपासून घ्यावे. कॉलम, बीम, स्लॅब व जिन्यामध्ये कव्हर ब्लॉक अवश्य वापरावेत. स्लॅब सुरु कारण्याआधी प्लेट अथवा प्लायमधील जॉईंट हे सर्व सील करून घ्यावेत.

तसेच स्लॅब चालू होण्याआधी पूर्ण स्लॅब सेंटरिंग कामावर एकदा पाणी मारून घ्यावे. काँक्रेटसाठीची खडी ही अर्धा आणि पाऊना इंच अशी मिक्स असावी. VSI खडी योग्य आकार व साईझमध्ये आता आपल्याला मार्केटमध्ये उपलब्ध. स्लॅबसाठी वापरण्यात येणाऱ्या वाळू मध्ये माती ७% पेक्षा जास्त नसावी.

तसेच क्रश वाळू मध्ये देखील १५% पेक्षा जास्त डस्ट / पावडर नसावी. स्लॅब काँक्रेट वेळी देखील पाणी हे योग्य प्रमाणातच टाकावे अन्यथा स्लॅबला हवी असलेली ताकत मिळत नाही.

स्लॅब टाकत असताना उन्हामुळे व गरम हवामानात ओल्या स्लॅबमधील पाणी निघून जाऊन स्लॅब वर क्रॅक पडू शकतात, त्यामुळे स्लॅबची चटई भरल्यानंतर दीड ते दोन तासांनी त्यावरपाणी मारावे. ही प्रक्रिया निरंतर स्लॅब संपेपर्यंत सुरु ठेवावी. स्लॅबची जाडी सर्व ठिकाणी डिसाईननुसार बरोबर आहे का? हे चेक करावे.

आता आम्ही अदानी सिमेंट मार्फत आमच्या वेगवेगळ्या मीटिंगच्या माध्यमातून याच योग्य बांधकाम पद्धतीचा सर्वसामान्य बांधकाम घरामालक, ठेकेदार, मिस्त्री यांच्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करत आहोत.

बांधकाम दरम्यान खालील महत्वाच्या गोष्टींकडे प्रामुख्याने लक्ष देणेगरजेचे आहे. कारण साध्या साध्या गोष्टींची माहिती असणे आणि त्याचा अंतर्भाव कामात केल्याने खूप मोठा फरक आपल्या कामाच्या क्वालिटी मध्ये निश्चितच पडू शकतो. एक चांगले दीर्घायुषी, कमीत कमी मेंटेनन्स असणारे बांधकाम करण्यासाठी वरील गोष्टी नक्कीच फायदेशीर ठरू शकतील. आर्किटेक, इंजिनीअर आणि काम करणाऱ्या विविध टीम बरोबर घरमालकाला वरील गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे.

**इंजि. दिग्विजय राजकुमार देशमुख**
**(बी ई सिव्हील)**
**सिनिअर टेकनिकल इंजीनिअर**
**पत्ता – अदानी सिमेंट लिमिटेड**
**द ज्ञानेश्वर मोटार स्कुलजवळ,**
**भिस्तबाग चौक,**
**सावेडी, अहिल्यानगर.**
**मोबा. ७७२००९९९८९**
MailID : digvijay.deshmukh@adani.com



Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

## श्री छत्रपती अभियांत्रिकीमध्ये 'अ‍ॅण्टी करप्शन अवेअरनेस' सेमिनार

निंबळक – ॲण्टी करप्शन ब्युरो म्हणजेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात ॲण्टी करप्शन अवेअरनेस आणि सायबर अवेअरनेस या विषयावर मार्गदर्शनपर सेमिनार ३० ऑक्टोबर रोजी झाले.




श्री छत्रपती अभियांत्रिकीमध्ये 'ॲण्टी करप्शन अवेअरनेस' सेमिनारमध्ये माहिती देताना पी. आय. श्रीमती छाया देवरे.

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्त्या म्हणून लाचलुचपत विभाग, अहिल्यानगर येथील पी. आय. श्रीमती छाया देवरे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना लाचखोरी आणि भ्रष्टाचाराशी संबंधित गुन्ह्यांपासून सावध कसे राहावे, संस्था सार्वजनिक आणि खाजगी संस्थांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी कोणते कायदे आहेत आणि कायद्यांतर्गत कोणत्याही भ्रष्टाचारी कृतीची किंवा गुन्ह्याची तक्रार स्वीकारून त्याची प्रक्रिया कशी केली जाते, याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे कार्य, मुख्य उद्देश आणि काही उदाहरणांसह या विभागाचे महत्त्व पटवून दिले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी या व्याख्यानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये आणि भविष्यामध्ये देखील कोणती सावधानता बाळगली पाहिजे, याविषयी माहिती देत हे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी का महत्त्वाचे आहे, याविषयी विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. एम. के. भोसले, प्रा. एस. एम. वाळके, प्रा. पी. जी. निकम, प्रा. ए. बी. काळे, प्रा. एस. पी. विधाते, डॉ. व्ही. व्ही. पाटील, प्रा. बी. एन. खरड, प्रा. पी. आर. मुटकुळे यांच्यासमवेत सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे यांनी केले.

## श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टमध्ये भगवान गोवर्धन अन्नकोट महोत्सव उत्साहात

नगर – लाल टाकी रोड वरील श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टमध्ये श्री भगवान जगदीश च्या मंदिरात भगवान गोवर्धन अन्नकोट महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी अन्नकोट दर्शन व महाप्रसादाचे आयोजन केले होते. अन्नकोट मध्ये सुमारे १०० प्रकारचे पदार्थ देवाला अर्पण केले होते.

सौ.शिला दीपक काबरा, सौ.प्रमिला शिवदास डागा, सौ.विजया मनोज मुंदडा, सौ.अनुराधा श्रीकांत काकाणी, सौ. छाया चंद्रकांत काबरा, सौ. सरिता प्रविण बजाज, सौ.नेहा सुनील मुंदडा, सौ.पुष्पा श्रीकुमार सोनी, सौ. रेणुका जगदिश दरक, सौ. श्रध्दा जितेंद्र बिहाणी यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. सुरूवातीला वैष्णवी भजनी मंडळाने भजन सेवा दिली.

## आदर्श गाव मांजरसुंबा गडावर ३ नोव्हेंबर रोजी गोरक्षनाथ प्रकट दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रम

नगर – नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथे असलेल्या श्री गोरक्षनाथ गडावर यावर्षीही मोठ्या भक्तीभावाने गोरक्षनाथ प्रकट दिन साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होणार असून भाविकांसाठी विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू पंचांगानुसार कार्तिक शुद्ध त्रयोदशी (शु. १३) हा दिवस गोरक्षनाथ प्रकट दिन म्हणून ओळखला जातो. परंपरेनुसार, योगी मच्छिंद्रनाथांनी भस्म दिल्यानंतर बारा वर्षांनी योगी गोरक्षनाथजींना उकिरड्यातून बाहेर काढले आणि त्या दिवशीच गोरक्षनाथजींचे भूतलावर प्रकटले. म्हणून हा दिवस गोरक्षनाथ भक्तांसाठी अत्यंत पवित्र आणि उत्सवमय असतो. राज्यभरातील भाविक दरवर्षीप्रमाणे मोठ्या संख्येने मांजरसुंबा गडावर दर्शनासाठी येतात. या वर्षीचा गोरक्षनाथ प्रकट दिन ३ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणार आहे.



कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे – सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत महापूजा, सकाळी १० ते १२ वाजता भ.प. बाळकृष्ण महाराज कांबळे यांचे कीर्तन त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन

हा संपूर्ण धार्मिक कार्यक्रम गोरक्षनाथ ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी सचिव गोरक्षनाथ कदम यांनी आवाहन केले की, सर्व भाविक भक्तांनी या दिवशी उपस्थित राहून गोरक्षनाथ म हाराजांच्या आशीर्वादाचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा. या उत्सवामुळे मांजरसुंबा गावामध्ये सध्या धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक ग्रामस्थ आणि भाविक उत्साहाने तयारी करत आहेत.

## राधा–कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्साहात

### भक्तिमय वातावरणात छप्पन भोगचे नैवेद्य दाखवून महाआरती, भाविकांना महाप्रसादाचे वाटप

नगर – शहरातील सर्जे पुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा–कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी मंदिरात छप्पन भोगचे नैवेद्य दाखवून महाआरतीचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमासाठी शीख आणि पंजाबी समाजातील भाविक, महिला, तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या प्रारंभी हर श्री नाथ भजनी मंडळाच्या महिला कलाकारांनी सादर केलेल्या भजन–किर्तनाच्या सुरेल कार्यक्रमाने वातावरण भक्तिमय बनले. श्रीकृष्णाच्या भजने आणि पारंपारिक कीर्तनाच्या सुरावटींनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. उपस्थित भाविक या भक्तिरसात मंत्रमुग्ध झाले.

दरवर्षी गोवर्धन पूजेनंतर अन्नकोट महोत्सवाचे आयोजन मंदिरात केले जाते. या परंपरेनुसार यंदाही राधा–कृष्ण मंदिरात भक्तांनी विविध प्रकारचे मिठाई, फराळ, व पारंपरिक खाद्यपदार्थ आणले होते. सर्व अन्नपदार्थांची आकर्षक पद्धतीने सजावट करून छप्पन भोग म्हणून भगवान श्रीकृष्णाला नैवेद्य दाखविण्यात आला.

या प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, विश्वस्त मंडळ, तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. आरतीनंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद (लंगर) व प्रसादाचे वाटप करण्यात आले. या अन्नकोट महोत्सवात सर्व समाजघटकातील भाविकांनी सहभाग नोंदवला.

श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा संगम झालेल्या या सोहळ्याने सर्जेपुरा परिसर आध्यात्मिक आणि धार्मिक वातावरणाने प्रफुल्लित झाले होते.

## भोपाल येथे होणाऱ्या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी नगर येथील डॉ. कमर सुरुर यांना निमंत्रण

नगर – उर्दू साहित्याच्या प्रचारात आणि महिला लेखकांच्या प्रतिनिधित्वात सक्रिय भूमिका बजावणारी बनात आंतरराष्ट्रीय महिला साहित्य संघटना, दिल्ली, मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये आपला नववा वर्धापन दिन साजरा करत आहे. हा विशेष कार्यक्रम बाब–उल–इल्म पब्लिकेशन्सच्या सहकार्याने आयोजित केला आहे. यामध्ये नगर येथील कवयित्री, साहित्यिक, लेखिका डॉ. कमर सुरुर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. ते या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी भोपाल येथे रवाना झाली आहे.



डॉ. कमर सुरुरउर्दू साहित्यातील स्त्रीवादी विचार आणि वर्तमान काळाच्या आवश्यकता या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आणि अखिल भारतीय मुशायरामध्ये नगरचे प्रतिनिधित्व करतील. देशभरातील प्रमुख साहित्यिक या शैक्षणिक आणि साहित्यिक बैठकीत सहभागी होणार आहे.

## 'योग विद्या धाम'तर्फे २ नोव्हेंबरपासून 'शंख प्रक्षालन शिबिरा'चे आयोजन

नगर – योग विद्या धाम तर्फे शंख प्रक्षालन शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिबीर प्रमुख अनिरुद्ध भागवत यांनी दिली.

हे शिबिर २ नोव्हेंबर पासून सकाळी ६ ते ७ या वेळेत सावेडीतील योग भवन, ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूल जवळ व सिद्धीबाग व्यायाम शाळेच्या वर या ठिकाणी होईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२३१६२४३८.



मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) च्या वतीने सद्गुरु श्री शंकर महाराज प्रकट दिन सोहळा मंगल दत्तक्षेत्र येथे झाला.

## मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टच्यावतीने श्री शंकर महाराज प्रगट दिन उत्साहात

निंबळक – मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) च्या वतीने सद्गुरु श्री शंकर महाराज प्रकट दिन सोहळा मंगल दत्तक्षेत्र, एफ ७०, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे ३० ऑक्टोबर रोजी सकाळ पासूनच सनई, चौघडा, तुतारी या पारंपारिक वाद्यात सुरु झाला. यात श्रीं चा अभिषेक, श्री शंकरगीता पारायण, श्रीं चा पाळणा, श्रीं ची आरती, श्रीं चा पालखी सोहळा तद्नंतर महाप्रसाद, दर्शन सोहळा व आपल्या मंडळाची भजने तसेच सायंकाळी श्री नामदेव महिला भजनी मंडळ अहिल्यानगर या महिला वर्गांनी गाजवलेली भजनसंध्या यामुळे हा सोहळा मंगलमय, भक्तीमय अशा वातावरणात झाला.

याप्रसंगी आमदार विक्रमसिंह पाचपुते, बाळासाहेब महाडिक (जिल्हा उपाध्यक्ष भाजप) यांचा सन्मान भाऊंच्या तसेच जिल्हातील सर्व श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक व बालसंस्कार केंद्राचे मार्गदर्शक व प्रमुख चंद्रशेखर लोळगे यांचा सन्मान सेवेकरी पवन फिरोदिया यांचे हस्ते त्याचप्रमाणे संत श्री नामदेव भजनी मंडळाचे सदस्य तथा गायिका अनिता वाधवणे, मनिषा वाधवणे, शितल चौकटे, कोमल चौकटे, वंदना काकडे, सारिका सरोदे, स्वाती कोळेकर, सुनिता कोळी, गौरी कोळेकर व राकेश रोकडे यांचा सन्मान सेवेकरी भावना नवलानी, रंजना जामगांवकर, चारु तलरेजा, कविता शहा, पुजा जाधव, रेश्मा मुर्तडक, सारिका भंडारी, नलिनी क्षिरसागर, कशीश खंडेलवाल व उमाकांत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

## माळीवाडा येथील शंकर सावली मठातर्फे शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त शोभायात्रा

नगर – सद्गुरू शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त मठामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच प्रकट दीना निमित्त माळीवाडा परिसर येथून शोभायात्रा काढण्यात आली होती.

घोडेस्वार, पारंपारिक वाद्य, फुलांनी सजवलेली पालखी मध्ये शंकर महाराज यांची मूर्ती अशा शोभायात्राचे ठीक ठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात येत होते. शोभायात्रा मार्गावर सुंदर रांगोळी काढली होती. हि शोभायात्रा ब्राह्मण गली येथील मठापासून सुरु होऊन बारातोटी कारंजा, बंगाल चोकी, वसंत टॉकीज, कोठीची तालीम, ढोर गली, माळीवाडा चोक, श्री विशाल गणेश मंदिर, फुलसौंदर चौक मार्गे पुन्हा मठामध्ये आली. तसेच यावेळी प्रकट दिनानिमित्त तीन दिवस शंकर सावली मठ येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शंकर गीता पारायण, शोभायात्रा तसेच महाप्रसादाचे हि आयोजन करण्यात आले होते. प्रकट दिन कार्यक्रम यशस्वीते साठी सर्व सेवेकरी परिश्रम घेत होते. कार्यक्रमाचे नियोजन मठाधिपती कमलेश महाराज जंजाळे यांनी केले.



माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त शोभायात्रा काढण्यात आली होती.

# घरोघरी ब्लड कलेक्शन व तपासणी सेवेचा ‘आनंदऋषीजी हॉस्पिटल’मध्ये शुभारंभ

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील सेवाभाव रुग्णांसाठी वरदान : सजय गुगळे



आनंदऋषीजी हॉस्पिटलने रुग्णांच्या सोयीसाठी नगर शहरात घरोघरी जाऊन ब्लड कलेक्शन व तपासणी सेवेचा दीपप्रज्वलनाने शुभारंभ करण्यात आला.

नगर – अनेक आजारांचे योग्य निदान होण्यासाठी डॉक्टरांकडून रक्त तपासणीचा सल्ला दिला जातो. तसेच मधुमेह ग्रस्त रूग्णांना नियमित रक्त तपासणी करावी लागते. अनेकदा रक्त तपासणीसाठी लॅबमध्ये जाणे, रिपोर्टची वाट पाहणे वेळखाऊ असते. वयोवृद्धांना याचा अधिक त्रास होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलने घरोघरी जाऊन ब्लड कलेक्शन सेवा सुरु करुन आरोग्य क्षेत्रात सेवेचा नवीन मापदंड तयार केला आहे. आचार्यश्रींना अभिप्रेत मानवसेवा करताना जैन सोशल फेडरेशन सातत्याने नवनवीन उपक्रमातून सर्वसामान्य रूग्णांना सेवा देण्याचे अविरत कार्य चालवले आहे. हा सेवाभाव सर्वसामान्य रूग्णांसाठी वरदान आहे, असे कौतुकोद्गार स्नेहालय संस्थेचे अध्यक्ष संजय गुगळे यांनी काढले.

आनंदऋषीजी हॉस्पिटलने रुग्णांच्या सोयीसाठी नगर शहरात घरोघरी जाऊन ब्लड कलेक्शन व तपासणी सेवा सुरू केली आहे. अहिल्यानगर शहरातील रुग्णांसाठी १ नोव्हेंबर पासून ही सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेच्या शुभारंभ प्रसंगी संजय गुगळे बोलत होते. याप्रसंगी जिजाऊ ग्रुपच्या संस्थापक मनिषा गुगळे, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, प्रकाश छल्लानी, डॉ. आशिष भंडारी, परेश मंडलेचा, पियुष मंडलेचा, प्रफुल्ल भंडारी, पंकज नाबरिया, तुषार चांडक, हॉस्पिटलमधील पॅथोलॉजीस्ट डॉ. मुकुंद उंडे, लॅब टेक्निशियन संकेत वामन, जयवंत साठे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, आरोग्य क्षेत्रात योगदान देताना आनंदऋषीजी हॉस्पिटलने नेहमीच अत्याधुनिक वैद्यकीय सेवा रुग्णांना उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. ही सेवा देताना पैसे कमवणे हा हेतू नसून फक्त चांगले उपचार मिळणे हेच ध्येय आहे. आता रक्त तपासणी सेवा घरपोच देऊन हॉस्पिटलने रूग्णांची सोय पाहिली आहे. अनेक रुग्णांचा वेळ यामुळे वाचणार आहे. भविष्यातही असाच सेवाभाव ठेऊन कार्य करण्याचा प्रयत्न राहील.

मनिषा गुगळे म्हणाल्या की, आचार्यश्रींचे आशिर्वाद आणि प्रेरणा लाभलेल्या हॉस्पिटलने सातत्याने अत्याधुनिक आरोग्य सेवा देत राज्यात तसेच देशात नावलौकिक मिळविला आहे. नगरकर म्हणून हॉस्पिटलच्या कार्याचा नेहमीच अभिमान वाटतो. या कार्याला हातभार लावणे, योगदान देणे कायम आनंद देणारे असते.

पियुष मंडलेचा म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटल पैसे किंवा नफा कमावण्यासाठी नाही तर सेवा देण्यासाठी कार्यरत आहेत याची प्रचिती नेहमीच येते. प्रत्येक रूग्ण योग्य उपचार घेऊन हसतमुखाने घरी परतेल यासाठी सर्व डॉक्टर, स्टाफ कायम प्रयत्नशील असतो. लाखो रुग्णांना याचा अनुभव आला आहे. कोणताही आजार अचानक उद्भवत नसतो. अगदी हृदयविकाराची सुरूवातही लवकर झालेली असते. यासाठी योग्य वेळी आणि नियमित तपासणी आवश्यक असते. योग्य वेळी रक्त तपासणी केली तर भविष्यातील अनेक आजारांवर योग्य उपचार करणे शक्य होते. घरोघरी जाऊन रक्त तपासणी हा उपक्रम वैद्यकीय क्षेत्रासाठी आदर्शवत आहे.

डॉ. मुकुंद उंडे म्हणाले, सकाळी ८ ते रात्री ८ यावेळेत नगर शहर परिसरात हॉस्पिटलची टिम ब्लड कलेक्शन करून रिपोर्ट देणार आहे. त्यामुळे रुग्णांना घरबसल्या एक चांगली सुविधा मिळणार आहे. २० वर्षांपासून हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅब कार्यान्वित आहे. याठिकाणी आंतरराष्ट्रीय मानांकित तपासणी केली जाते. घरीच रक्त तपासणी होऊन रिपोर्ट मिळाल्याने रूग्णांना लवकर उपचार मिळून लाभ होणार आहे. या सेवेसाठी रूग्णांनी या ९३७३८०७८४२ मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लानी यांनी आभार मानले.



अहमदनगर येथील श्री रामअवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब व योगा ट्रेनिंग सेंटर ने मल्लखांब आणि योगासन या खेळांमध्ये नुकत्याच झालेल्या शालेय स्पर्धांमधून घवघवीत यश संपादन केले.

# महावीर मल्लखांब व योगा सेंटरच्या खेळाडूंचे शालेय स्पर्धेमध्ये यश

नगर – अहमदनगर येथील श्री रामअवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब व योगा ट्रेनिंग सेंटर ने मल्लखांब आणि योगासन या खेळांमध्ये नुकत्याच झालेल्या शालेय स्पर्धांमधून घवघवीत यश संपादन केले. यामध्ये मल्लखांब खेळामध्ये १० खेळाडूंची व योगासन या खेळ प्रकारात १२ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच चेन्नई येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये ओम सानप या खेळाडूंनी रौप्य पदक मिळवले आणि राजस्थान येथे होणाऱ्या खेलो इंडिया मल्लखांब स्पर्धेसाठी सेंटरच्या आदिनाथ साठे या खेळाडूची निवड झाली आहे. या खेळाडूंना ट्रस्टचे ट्रस्टी मोहन मानधना यांच्या हस्ते गौरवण्यात आले. निवड झालेल्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अहिल्यानगर मधील उद्योजक प्रसाद डोके यांच्या तर्फे ट्रॅक सूट प्रदान करण्यात आले. या सर्व खेळाडूंना सेंटरचे मुख्य प्रशिक्षक उमेश झोटिंग, कु. प्रणिता तरोटे, आप्पा लाढाने, अक्षय पावडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

निवड झालेल्या खेळाडूंची यादी खालील प्रमाणे – अर्णव हंपे, आदित्य गीते, श्लोक कंठाळे, आदित्य गुंड पाटील, दक्षिजा बोठे, तेजस्विनी शेळके, धनाश्री हराळे, ऋचा जाधव, गार्गी मोहोळे, देशपांडे शौर्य, उदय कारंडे, भागवत चैतन्य, सई मेहेत्रे, अथर्व हराळे, ओवी सराफ, पीहू सांगळे, देशपांडे वेदिका, ओम सानप, आदिनाथ साठे.

# पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे यश





नगर – महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी घेतलेल्या द्वितीय वर्ष जीएनएम व द्वितीय वर्ष एएनएमचा वार्षिक निकाल नुकताच जाहीर झाला असून काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिट्युटने उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष म्हस्के यांनी दिली.

जीएनएमच्या द्वितीय वर्षातील एकूण सहा विद्यार्थिनी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाल्या असून गोफणे पौर्णिमा गणेश हिने ९०.५७ टक्के मिळवत प्रथम, उघडे समीक्षा बबन हिने ८७.२८ टक्के गुण मिळवित द्वितीय तर शिंदे अनुजा संजय हिने ८४.१४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच एएनएम द्वितीय वर्षात पठारे सृष्टी रवींद्र हिने ७८.८३ टक्के गुण मिळवत प्रथम, ठाकरे आकांक्षा पंढरी हिने ७८.३३ टक्के गुण मिळवत दुसरा व सोळंके अनुपमा चंद्रकांत हिने ७६.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनचे विश्वस्त डॉ.सुमती म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ. दीप्ती ठाकरे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर्किटेक समीर ठाकरे, प्राचार्य अजित चवरदार तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# नगरचे अश्कान काझी, किरण चोरमले आणि रोनक अंदानी करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

## जिल्हा क्रिकेट असोसिएशन व हुंडेकरी स्पोर्टस् ॲकॅडमीच्या ३ खेळाडूंची निवड



नगर – जिल्ह्यातील हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमी आणि अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या तीन खेळाडूंची महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड झाली आहे. यामध्ये अश्कान काझी, किरण चोरमले आणि रोनक अंदानी यांचा समावेश आहे.

बीसीसीआयच्या २३ वर्षांखालील कर्नल सी. के. नायडू स्पर्धेसाठी अश्कान काझी आणि किरण चोरमले यांची महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड झाली असून, हे दोघेही एकत्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. तर १९ वर्षांखालील विणू मांकड स्पर्धेसाठी रोनक अंदानी याची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

किरण चोरमले हा उजव्या हाताचा फलंदाज व फिरकी गोलंदाज असून, यापूर्वी त्याने १९ वर्षांखालील आशिया चषकात भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

अश्कान काझी हा डावखुरा फलंदाज तसेच डावखुरा फिरकी गोलंदाज असून, त्याने अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट संघ व महाराष्ट्र राज्य संघासाठी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. निवड चाचणी सामन्यांमध्ये प्रभावी फलंदाजी करून त्याने ही संधी मिळवली आहे.

रोनक अंदानी हा उजव्या हाताचा जलदगती गोलंदाज असून, त्याने जिल्हा अंतर्गत आणि निवड चाचणी सामन्यांम ध्ये अचूक गोलंदाजी करत अनेक बळी मिळवले आहेत. त्याच्या कामगिरीमुळे त्याची निवड महाराष्ट्र राज्य संघात झाली आहे.

हे तिन्ही खेळाडू हुंडेकरी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमी, अहिल्यानगर येथे प्रशिक्षक सरफराज बांगडीवाले यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. या खेळाडूंच्या निवडीबद्दल आमदार संग्राम जगताप, असोसिएशनचे सचिव गणेश गोंडाळ, सहसचिव प्रा. माणिक विधाते, हुंडेकरी अ‍ॅकॅडमीचे संस्थापक वसीम हुंडेकरी यांनी अभिनंदन केले.

# राष्ट्रीय लेखक दिन

## समाजाचे आरसे आणि परिवर्तनाचे शिल्पकार

लेखन हे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर समाजाच्या विचारसंस्कृतीचे, भावविश्वाचे आणि काळाच्या स्पंदनाचे दस्तऐवजीकरण असते. म्हणूनच लेखक हा समाजाचा सजग साक्षीदार, चिंतक आणि परिवर्तनाचा वाहक असतो. दरवर्षी १ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय लेखक दिन (National Authors Day) हा दिवस या शब्दशिल्पींच्या कर्तृत्वाला, चिंतनाला आणि समाजातील योगदानाला सलाम करणारा दिवस आहे. साहित्य, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक परंपरेच्या संगमातून लेखक समाजाला आरसा दाखवतो, प्रश्न विचारतो आणि कधी कधी त्या समाजाला बदलाच्या दिशेने नेतो. या दिवसाचे महत्त्व फक्त लेखकाच्या गौरवापुरते मर्यादित नाही; ते सामाजिक जाणीवेचा, वैचारिक संवादाचा आणि सांस्कृतिक बांधिलकीचा उत्सव आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, लेखकाचे कार्य हे समाजरचनेच्या विविध घटकांशी निगडित असते. एमिल दुर्खाईमसारख्या समाजशास्त्रज्ञाने ‘सामाजिक वास्तव’ (Social Facts) या संकल्पनेद्वारे सांगितले की, समाजातील मूल्ये, विचार आणि नैतिकता ही व्यक्तीच्या पलीकडील एक सामूहिक शक्ती आहे. लेखक हीच सामूहिकता आपल्या शब्दांतून प्रतिबिंबित करतो. तो समाजातील वास्तव अनुभवतो, त्याचे अर्थ लावतो आणि त्यावर भाष्य करून समाजाच्या आत्मस्मृतीचा भाग बनतो. म्हणूनच प्रत्येक युगाचा लेखक त्या काळाच्या सामाजिक इतिहासाचा जिवंत साक्षी असतो. त्याची लेखणी काळाला दिशा देते आणि समाजाला अंतर्मुख करते.

भारतीय समाजाच्या संदर्भात पाहता, लेखन हे केवळ अभिव्यक्तीचे साधन नव्हते, तर सामाजिक संवाद आणि परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम राहिले आहे. संतकाव्याची परंपरा असो किंवा सुधारक चळवळीतील लेखन, भारतातील लेखकाने नेहमी सामाजिक जबाबदारी स्वीकारली आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत कबीर यांनी शब्दांच्या माध्यमातून समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. पुढे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, प्रबोधनकार ठाकरे, प्रेमचंद, शरतचंद्र, आचार्य अत्रे, अण्णाभाऊ साठे यांसारख्या लेखकांनी आपल्या काळातील विषमता, जातिभेद, शोषण आणि अन्याय याविरुद्ध लेखणी उचलली. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे तर, हे लेखक ‘सामाजिक बदलाचे शिल्पकार’ होते, जे समाजातील मूल्यव्यवस्थेला आव्हान देऊन नवी जाणीव निर्माण करीत होते.

लेखन ही समाजातील सांस्कृतिक भांडवलाची निर्मिती असते. पिएर बोर्द्यू यांनी "Cultural Capital' (सांस्कृतिक भांडवल) या संकल्पनेतून सांगितले की, ज्ञान, भाषा, अभिरुची, आणि प्रतीकात्मक मूल्ये ही समाजातील सत्ता–संबंध ठरवतात. लेखक हाच या सांस्कृतिक भांडवलाचा निर्माता असतो. त्याच्या लेखनातून नवे शब्द, नवी अर्थसृष्टी आणि नवे विचार उदयाला येतात. जेव्हा लेखक समाजातील वंचित, शोषित, अल्पसंख्याक वा उपेक्षित घटकांचा आवाज बनतो, तेव्हा तो समाजातील सत्ता–संबंधांमध्ये असंतुलन दाखवतो आणि न्याय्य रचनेसाठी संघर्ष करतो. म्हणून लेखक हा केवळ सर्जक नसतो, तर सामाजिक न्यायाचा वाहक असतो.

आधुनिक काळातही लेखनाचे स्वरूप बदलले असले तरी त्याची सामाजिक जबाबदारी कायम आहे. डिजिटल माध्यम, सोशल मीडिया, ब्लॉग, ई–पत्रिका यामुळे अभिव्यक्तीची क्षेत्रे विस्तारली आहेत, पण लेखकाचे काम तितकेच कठीण झाले आहे. कारण माहितीचा ओघ, दिशाभूल आणि भावनिक ध्रुवीकरण या नव्या आव्हानांनी लेखकाच्या स्वातंत्र्यावर नवे प्रश्न निर्माण केले आहेत. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट मार्क्युसे यांनी "Repressive Tolerance' (दमनकारी सहिष्णुता) या संकल्पनेद्वारे सांगितले होते की, आधुनिक समाजात स्वातंत्र्य दिले जाते पण त्याच स्वातंत्र्यातून नियंत्रणही ठेवले जाते. आजच्या काळातील लेखक या नियंत्रणाविरुद्ध, मतस्वातंत्र्याच्या आणि विवेकाच्या बाजूने उभा राहणे आवश्यक आहे. कारण लेखकाचे मौन हे सत्तेचे बळ बनते, तर त्याचा उच्चार समाजाच्या विवेकाचे द्योतक ठरतो.

भारतीय समाजात लेखक हा केवळ साहित्यिक नसून तो समाजकारणी, शिक्षक, विचारवंत आणि चळवळीकर्मीही राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन हे केवळ कायदेपंडिताचे नव्हे, तर समाजशास्त्रीय चिंतनाचे प्रतिक आहे. त्यांच्या लिखाणाने वंचित समाजाला आत्मसन्मान दिला आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखवला. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेच्या माध्यमातून सामाजिक वास्तव मांडले; त्यांचे लेखन समाजशास्त्रातील ‘लोकसंस्कृतीचे समाजशास्त्र’ या संकल्पनेला अधोरेखित करते. अशा लेखकांचे लेखन म्हणजे लोकसंस्कृतीचा आवाज आहे, जो शास्त्रीय आणि लोकजीवनाच्या मधोमध उभा आहे.

लेखक समाजाला केवळ विचार देत नाही, तर विचार करण्याची पद्धत घडवतो. त्याच्या लेखनामुळे वाचकांमध्ये सामाजिक भान निर्माण होते. समाजशास्त्रज्ञ अँथनी गिडन्स यांनी "Reflexivity' म्हणजेच आत्मपरीक्षणात्मक समाज ही संकल्पना मांडली. लेखक हे आत्मपरीक्षण शक्य करतो. तो समाजाला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी देतो. म्हणूनच लेखन हे समाजाच्या आरशासारखे असते; परंतु हा आरसा फक्त वास्तव दाखवत नाही, तर समाज कसा असावा याचाही विचार करायला लावतो. लेखकाची लेखणी समाजाच्या अंतःकरणात उतरते, प्रश्न विचारते आणि कधी कधी विद्रोह घडवते.

आजच्या काळात जेव्हा माहितीचा स्फोट झाला आहे, तेव्हा लेखकाची जबाबदारी अधिक वाढली आहे. तो सत्य आणि असत्य, विचार आणि अफवा, भावना आणि प्रचार यांच्यामधील सीमारेषा स्पष्ट करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखक समाजातील ‘सांस्कृतिक मध्यस्थ’ (Cultural Mediator) असतो, जो परंपरा आणि आधुनिकता, भावना आणि विवेक, स्थानिकता आणि जागतिकता यांचा संवाद घडवतो. जागतिकीकरणाच्या युगात स्थानिक भाषांतील लेखक समाजाच्या ओळखीचे रक्षण करत आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, पाली अशा भारतीय भाषांतील लेखक समाजाच्या मुळांशी जोडलेले आहेत आणि ते ‘स्थानिकतेचे समाजशास्त्र’ घडवतात.

लेखकाचे व्यक्तिमत्व हे समाजातील वर्ग, लिंग, जात, धर्म, संस्कृती आणि राजकारणाशी घट्ट गुंफलेले असते. समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांनी सांगितले की, साहित्य समाजाच्या आर्थिक अधिष्ठानाशी निगडित असते. लेखक त्या अधिष्ठानाचे प्रतिबिंब दाखवतो किंवा त्याविरुद्ध आवाज उठवतो. स्त्री लेखक, दलित लेखक, आदिवासी लेखक, अल्पसंख्याक लेखक यांनी त्यांच्या लेखनातून जो नवा दृष्टिकोन मांडला आहे, तो समाजशास्त्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या लेखनाने ‘प्रभुत्वशाली कथनां’ना आव्हान दिले आणि समाजातील असमानता उघड केली. त्यामुळे लेखक केवळ सौंदर्याचा रचनाकार नाही, तर सामाजिक सत्याचा विश्लेषकही आहे.

राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ उत्सव नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. या दिवशी आपण लेखकांना सन्मान देतो, पण त्याचबरोबर समाज म्हणून आपले वाचन, विचार आणि विवेक तपासतो. वाचकांशिवाय लेखक अपूर्ण आहे, आणि लेखकांशिवाय समाज मुक आहे. म्हणून हा दिवस लेखक–वाचक नात्याच्या संवेदनशीलतेचा दिवस आहे. प्रत्येक लेख, धडा, पुस्तक हे समाजाच्या संवादाचा भाग आहे, प्रत्येक शब्द हा परिवर्तनाचे बीज आहे.

आजच्या काळात जेव्हा अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येत आहेत, तेव्हा लेखकाने अधिक धैर्याने बोलणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखकाचे मौन हे ‘सांस्कृतिक अधिपत्या’च्या (Cultural Hegemony) बळकटीस कारणीभूत ठरते, तर त्याचा उच्चार लोकशाहीच्या प्राणवायूसारखा असतो. म्हणूनच लेखकाचा सन्मान म्हणजे विचारस्वातंत्र्याचा सन्मान आहे.

एकूणच पाहता, राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ साहित्याचा नव्हे, तर समाजाच्या आत्म्याचा उत्सव आहे. तो समाजाला स्मरण करून देतो की, लेखणी ही शस्त्र आहे, जी रक्त सांडत नाही, पण समाज जागवते. लेखक हा समाजाच्या विवेकाचा दीपस्तंभ आहे, जो काळोखातही प्रकाश देतो. समाजशास्त्रीय अर्थाने लेखक म्हणजे समाजाच्या चेतनेचा संरक्षक आहे. त्याचे लेखन म्हणजे समाजाच्या स्मृतींचे जतन आणि भविष्याचा आराखडा होय. त्यामुळे या दिवसाचे खरे औचित्य असे की, आपण प्रत्येकजण थोडासा ‘लेखक’ व्हावा, विचार करणारा, प्रश्न विचारणारा, आणि बदलाची बीजे पेरणारा. शब्दांमध्ये समाज जगतो, आणि लेखक त्याला अर्थ देतो.



राष्ट्रीय लेखक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



विळद घाट येथील मातोश्री वृद्धाश्रमात दिवाळी निमित्ताने विनायकराज प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ व्यक्तींना कपडे, फराळ, फळांचे वाटप करण्यात आले. (छाया – विजय मते)

# निराधारांना आधार देणे हा मानवतेचा खरा धर्म


## विनय वाखुरे यांचे प्रतिपादन; मातोश्री वृद्धाश्रमात कपडे फराळ फळांचे ज्येष्ठ नागरिकांना वाटप

नगर – समाजात आपला उपयोग दुसऱ्यांचे हित साधण्यात होत असेल तर त्याचा सदुपयोग जरूर करावा, माणसाने माणुसकी पण जपावे, स्वतःच्या आनंदात दुसऱ्यांना आनंद कसा देता येईल हे पहावे, तहानलेल्यांना पाणी आणि भुकेलेल्यांना अन्नदान देणे ही आपली संस्कृती आहे.समाजात ज्यांना कोणी नाही अशा निराधारांना आधार देणे हा आपला मानवतेचा खरा धर्म आहे, असे प्रतिपादन उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी केले.

विळद घाट येथील मातोश्री वृद्धाश्रमात विनायकराज प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ, निराधार, अनाथ वृद्धांना दिवाळीनिमित्त कपडे, फराळ व फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष विनय वाखुरे, महेश डोखे, अतुल देव्हारे, मृगाक मुळे, संदीप चौधरी, पांडुरंग कोलते, सागर ठाकूर, महेश थोरात, अनिल लगड तसेच सदस्य उपस्थित होते. श्री.वाखुरे पुढे म्हणाले स्वर्गीय आमदार अनिल राठोड यांनी निराधार, अनाथ अशा लोकांसाठी मातोश्री वृद्धाश्रम स्थापन केले. तेव्हापासून ते आजपर्यंत १२ वर्षापासून आमच्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून आमचे सर्व सदस्य एकत्र येऊन येथील वृद्धांसाठी दरवर्षी दिवाळीला कपडे, फराळ व फळांचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहण्याचा आमचा मानस आहे. या सेवेमध्ये सर्वांचा सहभाग असल्याने हे शक्य होत आहे. दुसऱ्यांच्या आनंदात आम्ही आमचा आनंद मिळवण्याचा प्रयत्न करतो या उपक्रमास संचालक दिलीप चोरडिया यांचे सहकार्य लागते.

या उपक्रमाबद्दल मातोश्री वृद्धाश्रम ट्रस्टचे दिलीप चोरडिया यांनी आभार मानले.

# आरपीआयचा महाड येथे ३ नोव्हेंबरला ‘चवदार तळ्याचा सत्याग्रह’ कार्यक्रम



नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचा ६८ वा वर्धापन दिन ऐतिहासिक महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रह क्रांतीभूमीवर साजरा होणार आहे. हा कार्यक्रम ३ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला असून, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमात अहिल्यानगर शहर, जिल्हा व तालुक्यातील सर्व आजी–माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी केले आहे.

महाडच्या चवदार तळ्याची क्रांतीभूमी ही भारतीय सामाजिक इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण जागा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली इथूनच समानता आणि मानवतेचा संदेश दिला गेला होता. त्या पवित्र भूमीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा हा ६८ वा वर्धापन दिन साजरा होत असल्याने या सोहळ्याला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

या कार्यक्रमासाठी पक्षाचे राष्ट्रीय महासचिव अविनाश मातेकर, राष्ट्रीय अध्यक्षा सीमाताई आठवले, जीत आठवले, प्रदेशाध्यक्ष राजेश सरवदे, प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम, प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे, राज्य उपाध्यक्ष व संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, तसेच राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे उपस्थित राहणार आहेत. या सर्व नेत्यांच्या उपस्थितीत पक्षाच्या पुढील वाटचालीचा आणि आगामी निवडणूक धोरणाचा आराखडा सादर केला जाणार आहे.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले या वर्धापन दिन सोहळ्याच्या निमित्ताने पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. लवकरच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होणार असल्याने, या मेळाव्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, निवडणुकीतील रणनीती ठरविणे आणि समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाचे पुढील पाऊल निश्चित करणे, या मुद्द्यांवर आठवले मार्गदर्शन करणार असल्याची माहिती सुनील साळवे यांनी दिली.

जिल्हाध्यक्ष साळवे यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी महाड येथील चांदे मैदान, क्रांतीभूमी, तालुका महाड, जिल्हा रायगड येथे होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित रहावे. हा केवळ वर्धापन दिन नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्मरण आणि समाज परिवर्तनाच्या चळवळीला नवचैतन्य देणारा सोहळा ठरणार आहे.




# तंबाखूचा धोका जास्त

सिगारेट जास्त धोकादायक आहेत की तंबाखू, हा प्रश्न विचारल्यावर बहुतेक लोक 'सिगारेट' असे उत्तर म्हणतात. तथापि, अलिकडच्या एका अभ्यासात दिसून आले आहे, की तंबाखू आपल्या शरीराचे सिगारेटपेक्षा जास्त पटींनी नुकसान करते.
सिगारेटच्या धुराचे हवेत वाष्पीकरण होते, तर तंबाखू थेट आपल्या तोंडातील पेशींना नुकसान पोहोचवते. यामुळे जखमा होतात. त्या हळूहळू कर्करोगात बदलतात. एका जागतिक अभ्यासातून दिसून आले आहे, की दररोज तंबाखू सेवन करणाऱ्या लोकांमध्ये तोंड आणि घशाचा कर्करोग जगभरात सामान्य आहे. यामुळे कर्करोगाच्या पेशी वेगाने विकसित होतात आणि संपूर्ण तोंडात पसरतात. अनेक प्रकरणांमध्ये हा कर्करोग घशातही पसरतो.

आरोग्यवेध
**डॉ. सतीश सोनवणे**

संशोधनात, शास्त्रज्ञांना आढळून आले, की तंबाखूमध्ये आढळणारे नायट्रोसामाइन्स आणि पॉलीसायक्लिक अरोमॅटिक हायड्रोकार्बन्ससारखे पदार्थ आपल्या पेशींमधील 'डीएनए'चे ला थेट नुकसान करतात आणि निरोगी पेशींना मारून कर्करोगाच्या पेशी वाढवतात. दुसरीकडे, सिगारेटमध्ये निकोटीन आणि टारचे प्रमाण जास्त असते. हे आपल्या फुफ्फुसांना नुकसान पोहोचवतात; परंतु त्यातून निघणारा धूर थेट शरीराशी किंवा पेशींशी संपर्क साधत नाही.



त्यामुळे ते तंबाखूपेक्षा कमी हानिकारक बनते.

**व्यसनी कसे होतात?**

आजकाल तंबाखू आणि गुटखा खाण्याची फॅशन झाली आहे. तरुण लोक तणाव, नैराश्य किंवा साथीदारांच्या दबावामुळे या व्यसनाधीन पदार्थांचे सेवन करू लागतात. हळूहळू ती सवय बनते. एकदा व्यसनाधीन झाल्यानंतर ते सोडणे खूप कठीण होते. दररोज गुटखा किंवा तंबाखू चघळल्याने तोंडात हळूहळू किरकोळ जखमा होतात. याव्यतिरिक्त दात किडणे आणि हिरड्यांचे आजार होऊ शकतात. त्यातून शेवटी कर्करोग होऊ शकतो.

**उपचार काय आहे?**

कर्करोगाचा उपचार अनेकदा कठीण आणि महाग असतो. शिवाय, रुग्णाच्या जगण्याची शक्यता कमी असते. कारण बहुतेक प्रकरणांमध्ये तो आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात आढळतो. ही सवय लवकर बंद केली तर कर्करोगासारखा गंभीर आजार टाळता येऊ शकतो. त्यासाठी जागरूकता वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सरकारे आणि अनेक स्वयंसेवी संस्था या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

# प्रदूषण आणि बदलत्या जीवनशैलीमुळे वाढते आजार

सूर्यप्रकाश हा मानवी जीवनातील सर्वात आवश्यक घटकांपैकी एक आहे. पुरेशा सूर्यप्रकाशाचा अभाव विविध आजारांना कारणीभूत ठरू शकतो. उन्हाळ्यात तेजस्वी सूर्यप्रकाश आणि हिवाळ्यात सौम्य सूर्यप्रकाश हा लोकांच्या दैनंदिन दिनचर्येचा एक भाग आहे; पण आता परिस्थिती बदलत आहे. शहरी प्रदूषणामुळे केवळ हवा प्रदूषित झाली नाही, तर सूर्यप्रकाशाची चमकही मंदावली आहे. याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होत आहे. विशेषतः 'सूर्यप्रकाश जीवनसत्व' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'व्हिटॅमिन डी'वर परिणाम होत आहे.

हवेतील धूळ, धूर आणि विषारी कण सूर्याच्या किरणांना पृथ्वीवर योग्यरित्या पोहोचण्यापासून रोखतात. त्वचेवर पडणारे यूव्हीबी किरण ही शरीराला व्हिटॅमिन डी तयार करण्यासाठी आवश्यक असलेली ऊर्जा आहे. तथापि, प्रदूषणाच्या थरांमुळे हा प्रकाश कमकुवत होतो तेव्हा शरीराला त्याचा पूर्णपणे फायदा होऊ शकत नाही. म्हणूनच दिल्ली, मुंबई आणि बंगळुरूसारख्या प्रमुख शहरांमध्ये राहणारे लोक सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असूनही व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे ग्रस्त आहेत.

**भारतात ही समस्या इतकी व्यापक का?**

व्याधी विचार
**डॉ. महेश दळे**

वर्षभर सूर्यप्रकाश असलेल्या देशात लोक या कमतरतेशी झुंजत असण्यामागे अनेक कारणे आहेत. उदाहरणार्थ, लोक दिवसाचा बराचसा वेळ सकाळी आणि संध्याकाळी सूर्यप्रकाशाऐवजी ऑफिसमध्ये किंवा घरात घालवतात. फॅशन आणि सनस्क्रीन



सूर्यप्रकाश टाळण्याचा प्रयत्न करतात. शिवाय, प्रदूषणामुळे आता उरलेला सूर्यप्रकाशही कमी झाला आहे. संशोधनातून दिसून आले आहे, की प्रदूषित भागात राहणारे लोक, सूर्यप्रकाशात जास्त वेळ घालवल्यानंतरही, स्वच्छ वातावरणात सूर्यप्रकाशाच्या अल्प कालावधीइतके व्हिटॅमिन डी तयार करत नाहीत.

**व्हिटॅमिन डीची कमतरता कशामुळे होते?**

व्हिटॅमिन डी हाडांसाठी आवश्यक आहे. त्याच्या कमतरतेमुळे मुलांमध्ये रिकेट्स (हाडांची वक्रता) आणि प्रौढांमध्ये ऑस्टिओपोरोसिससारख्या समस्यांचा धोका वाढतो. सतत थकवा, स्नायू दुखणे, नैराश्य आणि वारंवार आजारपण हीदेखील लक्षणे असू शकतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, भारतासारख्या देशात, ७० टक्क्यांहून अधिक लोक काही प्रमाणात व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे ग्रस्त आहेत.

**काय करावे?**

हे टाळण्यासाठी, सकाळी उन्हात २० ते ३० मिनिटे घालवण्याचा प्रयत्न करावा. प्रमुख शहरात राहणाऱ्यांनी उद्याने किंवा मोकळ्या जागांमध्ये सूर्यस्नान करण्याची सवय लावावी. आहारात अंडी, मासे आणि दूध यासारखे पदार्थ समाविष्ट करावेत. त्यामध्ये व्हिटॅमिन डी भरपूर प्रमाणात असते. गरज पडल्यास, डॉक्टरांच्या सल्ल्याने पूरक आहारदेखील घेता येतो.

# स्मरणशक्ती सुधारण्यासाठी

आपली स्मरणशक्ती टिकून रहावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. पण आजच्या काळात अनेक कारणांमुळे विस्मरणाचं प्रमाण वाढत चाललं आहे. तल्लख बुद्धीसाठी तसंच स्मरणशक्ती टिकवून ठेवण्यासाठी काही आयुर्वेदिक औषधी उपयुक्त ठरू शकतात. अशाच काही औषधींविषयी...

**ब्राह्मी:** हा स्मरणशक्ती सुधारण्याचा रामबाण उपाय आहे. या गुणधर्मामुळे ब्राह्मीवर बरंच संशोधनही झालं आहे. ब्राह्मीच्या सेवनाने मेंदूची क्षमता सुधारते. यासोबतच या औषधामुळे मेंदू ताजातवाना होतो. आपल्याला खूप शांत वाटतं. ताण

आयुर्वेद आणि विकार

कमी करण्यासाठीही ब्राह्मीचा वापर करता येईल.

**जिंको:** या आयुर्वेदिक औषधावर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. जिंकोमुळे मज्जासंस्थेचं रक्ताभिसरण सुधारून मेंदूला चालना मिळते. यासोबतच हे औषध शरीरातल्या विविध पेशींना झालेलं नुकसानही भरून काढतं. अश्वगंधामुळे मेंदूची सर्वांगिण कार्यक्षमता



वाढते आणि स्मरणशक्तीही सुधारते.

**ज्येष्ठमध :** ही मेंदूच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त औषध आहे. ज्येष्ठमधाच्या सेवनानंतर आपल्याला खूप शांत वाटतं. ताण, चिंता, काळजी अशा मानसिक आजारांवरही ज्येष्ठमध उपयुक्त ठरतो. त्यामुळे ज्येष्ठमधाचं नियमित सेवन करायला हवं.



# अशी करावी योगासने

योगासनांमुळे आरोग्य उत्तम रहायला मदत होत असली तरी ही आसनं योग्य पद्धतीने करणंही गरजेचं असतं. योगासनं करताना होणाऱ्या काही चुकांमुळे त्रास होऊ शकतो. त्यातही नवखे असताना बरीच काळजी घ्यावी लागते.

नवख्यांनी योगा क्लासमध्ये पहिल्या रांगेत बसण्याऐवजी शक्यतो मागे बसावं. यामुळे योगा प्रशिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष ठेवता येईल. दुसरं म्हणजे क्लासमधल्या इतरांची कृतीही न्याहाळता येईल.

काहीजण श्वास जास्त वेळ रोखून धरतात. पण हे चुकीचं आहे. ३० सेकंदांपेक्षा जास्त वेळ श्वास रोखून धरू नये. श्वास जास्त काळ रोखून धरल्यामुळे शरीरातल्या ऑक्सिजनच्या प्रवाहावर परिणाम होऊन घुसमटल्यासारखं वाटू शकतं.

आपण कुठे चुकतो


योगा करताना शरीराची स्थिती योग्य असणंही तितकंच गरजेचं आहे. बसण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे योगाचे काहीच लाभ मिळणार नाहीत. शिवाय इतर दुखणी मागे लागू शकतात. अखेरच्या टप्प्यात शवासन केलं जातं. यामुळे योग केल्यानंतर शरीराला आराम मिळतो. म्हणूनच शवासन टाळू नये. भरल्या पोटी योगा करू नये.

# दुर्लक्ष पडेल महागात

मेंदूच्या नसांमध्ये रक्तप्रवाह करणाऱ्या नसांना दुखापत झाली किंवा त्या फुटल्या तर आपल्याला पक्षाघात किंवा ब्रेन स्ट्रोक येत असतो. त्यामुळे शरीराचे अवयव लुळे होऊ शकतात किंवा दृष्टी, बोलणे वा चालणे अथवा ऐकणे अशा क्रियांवर परिणाम होऊन त्या बंददेखील पडू शकतात किंवा मेंदूत अधिक रक्तस्राव झाल्यास मृत्यूदेखील येऊ शकतो.

मेंदूची एखादी नस ब्लॉक होते, तेव्हा ब्रेन स्ट्रोक येतो. या जीवघेण्या स्थितीवर वेळीच उपचार न केल्यास मृत्यूदेखील येऊ शकतो. ब्रेन स्ट्रोक मोठा अटॅक येण्याआधीच येऊ शकतो. याची लक्षणे वेळीच ओळखली, तर मोठा अटॅक येण्यापासून वाचता येते. याला 'मिनी ब्रेन स्ट्रोक' वा 'ट्रान्सिएंट इस्केमिक अटॅक'देखील म्हणतात

'ब्रेन स्ट्रोक'ला पक्षाघातदेखील म्हणतात.



शरीर काही तास आधी या आजाराचे संकेत देत असते. एक दिवस आधी आपल्याला संकेत मिळतात. त्यामुळे 'ब्रेन स्ट्रोक'चा मोठा झटका येण्याआधी उपचार सुरू केल्यास रुग्णाला वाचवता येते.

**केव्हा येतो स्ट्रोक ?**

मेंदूची एखादी नस ब्लॉक झाल्याने 'ब्रेन स्ट्रोक'सारखा छोटा ब्रेन अटॅकदेखील येऊ शकतो. याचे कारण मेंदूला ऑक्सिजन मिळणे बंद होते; परंतु हे नुकसान स्थायी नसते आणि २४ तासात आपोआप बरेदेखील होत असते; परंतु याची लक्षणे गंभीरतेने घ्यायला हवीत आणि डॉक्टरांचा सल्लाही तातडीने घेणे गरजेचे असते.

**'मिनी ब्रेन स्ट्रोक'च्या लक्षणांवर नजर ठेवा**

* शरीराच्या एका बाजूला चेहरा किंवा हात वा पायात सुन्नपणा येणे किंवा अशक्तपणा येणे
* अचानक भ्रम होणे
* अचानक बोलण्यात अडचणी येणे
* अचानक दिसायला त्रास किंवा अडचण येणे

आरोग्यमंत्र
**डॉ. मुकुंद विधाते**

* अचानक तोल जाणे
* चालताना अचानक अडचण येणे
* चक्कर येणे

**स्ट्रोकपासून वाचण्यासाठी डाएट**

ब्रेन स्ट्रोक पासून वाचण्यासाठी कमी चरबी असलेला, कमी मीठ आणि अधिक फायबर असलेला आहार घ्यावा. त्यासाठी आहारात पेअर, स्ट्रॉबेरी, एव्हाकॅडो, सफरचंद, केळे, गाजर, बीट आदी पदार्थांचा समावेश करता येतो.

# तरुण बनताहेत निद्रानाशाचे बळी


आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत प्रत्येकजण आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे. काम, अभ्यास, सोशल मीडिया, गेम आणि ताणतणाव हे त्यांच्या आरोग्यापासून अधिकाधिक लक्ष विचलित करत आहेत. परिस्थिती अशा टप्प्यावर पोहोचली आहे, की जिथे तासनतास रील बघण्याच्या व्यसनामुळे आपली झोप हळूहळू दुर्लक्षित होत आहे. परिणामी, आपण जागे होतो, तेव्हा दिवसभर थकवा आणि आळस जाणवतो. न्यूझीलंडमधील ओटागो विद्यापीठात केलेल्या अलीकडील संशोधनातून असे दिसून आले आहे, की झोपण्यापूर्वी मोबाईल स्क्रीनवर सक्रिय असणाऱ्या आजच्या तरुणांची, विशेषतः किशोरवयीन मुलांच्या झोपेची गुणवत्ता खराब होत आहे. आजकाल, विविध कारणांमुळे तरुणांना पुरेशी आणि चांगली झोप मिळत नाही. वाढलेला स्क्रीन टाइम हे झोपेच्या विकारांचे सर्वात मोठे कारण आहे. दिवसभरच नव्हे तर झोपण्यापूर्वीदेखील मोबाईल फोन, लॅपटॉप आणि टेलिव्हिजनचा वापर केला जात आहे. शारीरिक हालचालींचा अभावदेखील तरुणांच्या झोपेला अडथळा आणत आहे.

आरोग्य वार्ता
**डॉ. प्रसन्न नेने**

दिवसभर बसून अभ्यास करणे किंवा गेम खेळणे ही सामान्य गोष्ट झाली आहे. 'सोशल मीडिया'चा दबाव, सतत ऑनलाइन राहणे, इतरांच्या पोस्ट पाहणे यामुळे मनाला आराम मिळत नाही. परिणामी चांगली झोप येत नाही. याव्यतिरिक्त, रात्री उशिरा नाश्ता, जड जेवण किंवा कॅफिनयुक्त पेये पिण्यामुळे झोपेत व्यत्यय येतो.

**संशोधन काय म्हणते?**

ओटागो विद्यापीठाने याबाबत केलेल्या संशोधनात शंभरहून अधिक किशोरवयीन मुलांच्या झोपेच्या आणि झोपेपूर्वीच्या सवयींचे परीक्षण करण्यात आले. अभ्यासात दिसून आले, की ९९ टक्के किशोरवयीन मुले झोपेपर्यंत स्क्रीन वापरतात. ६३ टक्के किशोरवयीन मुले झोपण्यापूर्वी काहीतरी खातात. २२ टक्के किशोरवयीन मुले झोपण्यापूर्वी व्यायाम करतात. तथापि, ज्यांनी या सवयी टाळण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या झोपेत फारसा फरक



दिसला नाही.

या सवयींमुळे झोपेची गुणवत्ता सुधारेल

दररोज सकाळी थकवा जाणवत असेल किंवा रात्री नीट झोप येत नसेल, तर काही सोप्या सवयी अवलंबण्याचा प्रयत्न करावा. दररोज ठराविक वेळी झोपावे आणि उठावे. रात्री शांत करणाऱ्या क्रियाकलापांमध्ये व्यस्त रहावे, जसे की पुस्तक वाचणे, संगीत ऐकणे किंवा ध्यान करणे. झोपण्यापूर्वी जास्त खाऊ नये; पण भूकही लागू देऊ नये. संध्याकाळी पाचनंतर कॅफिनयुक्त पदार्थ टाळावेत आणि स्क्रीन टाइम मर्यादित करावा.

# नर्व्हस ब्रेकडाउनविषयी...

सध्याच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक युगात प्रत्येकावर ताणाने कुरघोडी केली आहे. आज मानसिक आणि शारीरिक ताणतणावांपासून कोणीही लांब राहिलेलं नाही. आयुष्यातल्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करताना प्रत्येकाला कधी ना कधी हरल्यासारखं, थकल्यासारखं वाटतं, आयुष्यात काहीच उरलेलं नाही अशी भावना निर्माण होते. ताणामुळे दैनंदिन आयुष्यातली कामं करताना अडचणी येतात. या स्थितीला नर्व्हस ब्रेकडाऊन असं म्हटलं जातं. नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नाही. मात्र नैराश्य, पोस्ट ट्रॉमेटिक स्ट्रेस डिसऑर्डरसारख्या मानसिक विकारांचे परिणाम विषद करण्यासाठी या शब्दाचा वापर केला जातो.

नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नसल्यामुळे याची लक्षणं व्यक्तिनुसार आणि त्याच्या मानसिक स्थितीनुसार बदलत रहातात. मात्र याची काही सर्वसाधारण लक्षणं असतात. सतत अस्वस्थ वाटणं, नैराश्य, भीतीची भावना वाढीस लागणं, झोपेत अडथळे येणं, आहाराच्या सवयींमध्ये बदल होणं, एकाग्रता भंग पावणं, मनात आत्महत्येचे विचार येणं, मूड बदलत रहाणं, श्वास घ्यायला त्रास होणं, छातीत दुखणं, चक्कर येणं, पोट बिघडणं, सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी न होणं, एकटं रहाणं ही नर्व्हस ब्रेकडाउनची काही



लक्षणं आहेत.

खास बात

नर्व्हस ब्रेकडाऊनची बरीच कारणं असतात. प्रचंड ताण आणि दबावामुळे माणूस नैराश्याच्या गर्तेत जाऊ शकतो. जवळच्या व्यक्तीचा अचानक झालेला मृत्यू माणसाला निराश करून सोडतो. सततचा कामाचा ताण, आर्थिक चणचण, जबाबदाऱ्यांचं ओझं, अभ्यासाचा ताण, शारीरिक आणि मानसिक त्रास अशा असंख्य बाबी नर्व्हस ब्रेकडाऊनला कारणीभूत ठरू शकतात.

नर्व्हस ब्रेकडाउन किंवा इतर कोणत्याही मानसिक विकारावर उपचार आहेत. रुग्णाची मानसिक स्थिती आणि लक्षणं यावर उपचारांची दिशा ठरते. उपचारांची पद्धत व्यक्तिनुसार बदलत रहाते. लक्षणांनुसार डॉक्टर समुपदेशन किंवा सायकोथेरेपीचा सल्ला देतात. काही औषधंही लिहून दिली जातात. यात नैराश्य कमी करणाऱ्या औषधांचा समावेश असतो.

जीवनशैलीतले काही बदलही नर्व्हस ब्रेकडाऊन, नैराश्य, ताण अशा मानसिक आजारांना आळा घालू शकतात. हा त्रास कमी करण्यासाठी वादविवाद लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. शरीरासोबतच मनाला आराम देणारे योगा, मेडिटेशन, दीर्घ श्वसन असे व्यायाम नियमितपणे करा. दररोज किमान ३० मिनिटं व्यायाम केल्याने बराच फरक पडू शकतो. घराबाहेर पडा, आवडीच्या गोष्टी करा. एकटेपणामुळे नैराश्यात वाढ होऊ शकते.

त्यामुळे वेगवेगळ्या लोकांशी संवाद साधा, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हा. झोपण्याच्या वेळा निश्चित करा. सकस आहार घ्या. अल्कोहोल, कॅफेन यांचं सेवन कमी प्रमाणात करा. काही कारणांमुळे आयुष्यात नैराश्याचे प्रसंग येतात. पण याचा अर्थ तुम्ही नर्व्हस ब्रेकडाऊनला बळी पडला आहात असा होत नाही. त्यामुळे लक्षणं जाणून मगच उपचार करा.

# मुलांमध्ये आढळला मधुमेहाचा नवीन प्रकार

अलिकडच्या काळात मधुमेहाची प्रकरणे केवळ वृद्ध आणि तरुणांपुरती मर्यादित नाहीत, तर मुलांमध्येदेखील दिसून येत आहेत. या संदर्भात, इंग्लंडमधील शास्त्रज्ञांनी मधुमेहाचा एक नवीन आणि दुर्मिळ प्रकार ओळखला आहे, जो केवळ सहा महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये आढळतो. या आजाराचे कारण १६७ नावाच्या जनुकातील उत्परिवर्तन आहे.

१६७ जनुकांमधील उत्परिवर्तनामुळे होणारा हा मधुमेह प्रकार टाईप १, २ किंवा ३ पेक्षा वेगळा आहे. टाइप १ प्रकारात, शरीराची रोगप्रतिकारक शक्ती इन्सुलिन उत्पादक पेशी नष्ट करते तर टाइप २ प्रकारात शरीर इन्सुलिनचा योग्य वापर करू शकत नाही. टाइप ३ हा मेंदूच्या विकासाशी संबंधित एक दुर्मिळ प्रकार आहे. याउलट १६७ उत्परिवर्तनामुळे होणारा मधुमेह इन्सुलिन उत्पादक पेशींमध्ये बिघाड निर्माण करतो.

आरोग्य विज्ञान
**डॉ. गोवर्धन हुसळे**




त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते.

**१६७ प्रकाराच्या मधुमेहामुळे काय होते?**

१६७ उत्परिवर्तनामुळे होणाऱ्या मधुमेहामुळे तहान वाढणे, वजन कमी होणे, थकवा आणि रक्तातील साखर वाढणे अशी लक्षणे उद्भवू शकतात. शिवाय, या आजाराने ग्रस्त मुलांच्या मेंदूच्या विकासात अडथळा येऊ शकतो. जसे की मायक्रोसेफली (डोक्याच्या सामान्य आकारापेक्षा लहान) आणि अपस्मार सारख्या न्यूरोलॉजिकल समस्यादेखील येऊ शकतात. ही स्थिती आयुष्यभर राहू शकते किंवा काही महिन्यांनंतर बरी होऊ शकते; परंतु कधी कधी ती काही काळाने पुन्हा उद्भवू शकते.

**निदान आणि उपचार**

या आजारावर सध्या कायमचा इलाज नाही; परंतु इन्सुलिन थेरपी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकते. या आजाराचे निदान करण्यासाठी जीन चाचणी आणि स्टेम सेल मॉडेल्सचा वापर केला जाऊ शकतो.

# महामार्गासाठीच्या भूसंपादनाचा १० वर्षानंतरही मोबदला मिळेना

नगर – नगर–कल्याण राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनामुळे बाधित झालेल्या पारनेर तालुक्यातील सावरगांव व धोत्रे बुद्रुक येथील शेतकऱ्यांना अद्यापही योग्य मोबदला न मिळाल्याने गेल्या काही वर्षांपासून असंतोष वाढत होता. अखेर या प्रलंबित प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी ३१ ऑक्टोबर रोजी प्रांताधिकारी कार्यालय येथे खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत महत्वपूर्ण बैठक पार पडली. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीसाठी शेतकरीही उपस्थित होते.

### खा.निलेश लंके धावले शेतकऱ्यांच्या मदतीला, प्रांताधिकाऱ्यांबरोबर घेतली बैठक



नगर–कल्याण राष्ट्रीय महामार्गासाठी केलेल्या भूसंपादनाचा शेतकऱ्यांना तातडीने मोबदला मिळावा या बाबत प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्याशी चर्चा करताना खा.नीलेश लंके.

सन २०१५ मध्ये नगर–कल्याण महामार्गाचे काम वेगाने पूर्ण व्हावे यासाठी या मार्गालगतच्या शेतजमीनी मोठया प्रमाणावर संपादित करण्यात आल्या होत्या. महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे विविध गावांचा बराचसा भाग प्रभावीत झाला. परंतु १० वर्षानंतरही सावरगांव व धोत्रे येथील शेतकऱ्यांना भरपाई मिळाली नाही, जी इतर शेतकऱ्यांच्या खात्यावर यापूर्वीच जमा झालेली आहे. शेतकऱ्यांनी वारंवार शासन, महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरवा केला, मात्र प्रक्रियात्मक गुंतागुंत, कागदपत्रे व विभागांतील समन्वयाअभावी मोबदला वितरणाचा प्रश्न अनुत्तरीत राहिला होता.

### तांत्रिक अडथळयांवर बैठकीत चर्चा

बैठकीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या दोन्ही विभागांच्या समन्वयात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे काही शेतकऱ्यांचे प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित राहिले आहेत. या तांत्रिक बाबी तातडीने सोडवून आवश्यक आर्थिक तरतूद करून मोबदला देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासनाकडून शेतकऱ्यांची संपूर्ण यादी, त्यांच्या भूखडांचे क्षेत्रफळ, भरपाईचे अंदाजपत्रक आणि मंजूर निधी यांचा सखोल आढावा घेण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांना प्रकरणातील तांत्रिक अडचणी पुढील आठवडयात दूर करण्याचे आदेश देण्यात आले.

### विलंब नको, शेतकऱ्यांना तात्काळ न्याय द्या

शेतकऱ्यांचा मोबदला हा त्यांचा हक्क आहे, उपकार नाही. विकासाच्या नावाखाली त्यांची जमीन घेतली, पण मोबदला मिळत नसल्यास तो अन्यायच आहे. या प्रकरणात वेळकाढूपणा चालणार नाही. संबंधित विभागंनी समन्वयक साधून लवकरात लवकर सर्व शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा. केंद्र व राज्य सरकारकडे या प्रकरणाबाबत सादरीकरण करण्यात येणार असून प्रकरण निकाली लागेपर्यंत मी स्वतः वैयक्तिकरित्या पाठपुरावा करणार आहे. असे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.

### मोबदला नव्हे, आमचा हक्क हवा

बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनीही आपल्या भावना मांडल्या. आम्ही विकासासाठी जमीनी दिल्या. परंतू १० वर्षानंतरही मोबदल्यासाठी शासन दरबारी हेलपाटे मारावे लागतात. आता आमचा संयम संपला आहे. प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

### प्रशासनाची सकारात्मक भूमिका

उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी शेतकऱ्यांच्या सर्व तक्रारींची नोंद घेऊन संबंधित विभागांना सूचना दिल्या. त्यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणाचा तातडीने निकाल लावून शेतकऱ्यांचा मोबदला वितरित केला जाईल. प्रांत कार्यालयाच्या पुढाकारातून आता सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची समिती गठीत करून ही समिती मोबदला प्रस्तावांचा पडताळी करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करेल.

### दीर्घ काळानंतर शेतकऱ्यांना दिलासा

दीर्घ काळानंतर त्यांच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. खा. लंके यांनी स्वतः पुढाकार घेतल्याने आमच्या समस्येचे निराकरण आता लवकर होईल असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले. नगर–कल्याण महामार्गाच्या भूसंपादन प्रकरणात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलले हे प्रयत्न त्यांच्या संघर्षातील एक निर्णायक टप्पा मानला जात आहे. येत्या काही आठवडयात मोबदला वितरणाची प्रक्रिया गती घेईल, अशी आशा आता शेतकरी वर्गामध्ये आहे.

## शेतकऱ्यांचा १७ नोव्हेंबरपासून 'आमरण उपोषणा'चा इशारा

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ (कल्याण–अहिल्यानगर – नांदेड) या रस्त्यासाठी हस्तांतरित झालेल्या जमिनीचा मोबदला अद्याप न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर श्रमिक कल्याण कामगार संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



राष्ट्रीय महामार्गात गेलेल्या जमिनीचा मोबदला मिळावा या मागणीचे निवेदन श्रमिक कल्याण कामगार संघटनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, २७ एप्रिल २०१६ रोजी राष्ट्रीय महामार्गासाठी बाजीराव माने, विठाबाई माने, नारायण माने, राजेंद्र माने, गणेश माने, हिराबाई माने या शेतकऱ्यांची जमीन हस्तांतरित करण्यात आली होती. मात्र, आजपर्यंत कोणताही आर्थिक मोबदला मिळालेला नाही, त्यामुळे या शेतकरी कुटुंबांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.यावेळी श्रमिक कल्याण कामगार संघटनेचे तानाजी शिंदे, राम शिंदे, बाजीराव माने, आशाबाई आमले, दत्ता माने तसेच इतर शेतकरी उपस्थित होते.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकरणात लक्ष घालून गोरगरीब शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला द्यावा. अन्यथा १७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवृत्तीवेतन धारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी २५ नोव्हेंबरअखेर हयातीचे दाखले सादर करावेत

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेतून निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतन धारकांनी स्वतः हयातीचे दाखले माहे २५ नोव्हेंबर अखेर अहिल्यानगर महानगरपालिका अर्थ विभाग, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे सादर करावेत. जे निवृत्तीवेतनधारक आपले हयातीचे दाखले सादर करणार नाहीत अशा निवृत्तीवेतन धारकांचे माहे नोव्हेंबर २०२५ चे सेवानिवृत्तीवेतन बँकेत पाठविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच येताना सोबत बँकेचे पासवुक घेऊन यावे, असे महानगरपालिकेने म्हटले आहे.

## निवृत्तीवेतन धारकांनी हयातीचा दाखला सादर करावा

नगर – महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ चा नियम ३३५ अन्वये दरवर्षी माहे नोव्हेंबरमध्ये निवृत्तीवेतनधारकांना ह्यातीचा दाखला देणे बंधनकारक आहे. त्यानुसार सर्व निवृत्ती व कुटूंब निवृत्तीवेतन धारकांच्या याद्या संबंधित बँकांकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत निवृत्तीवेतन धारकांनी संबंधित बँकेमध्ये आधारकार्ड, पॅनकार्ड आदी कागदपत्रांच्या पुराव्यांसह समक्ष बँकेमध्ये जाऊन बँकेत उपलब्ध करुन दिलेल्या यादीमध्ये आपल्या नावासमोर स्वाक्षरी करावी, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी जनार्दन सहारे यांनी केले आहे.

## नगर स्वच्छ व सुंदर होईपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही : आ. संग्राम जगताप

नगर – शहरातील बहुतांशी भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणाचे कामे पूर्णत्वास आले आहेत. या रस्त्यांमुळे नगर शहराचा चेहरामोहरा बदलला असून वेगळी ओळख निर्माण होत आहे. शहरातील रस्ते आता चांगले व दर्जेदार झाले असले तरी सर्वत्र मोठ्याप्रमाणात स्वच्छता व कचरा दिसत आहे. हे चित्र शहराच्या सौदर्याला बाधा आणणारे आहे. त्यामुळे आपल्या शहराप्रती अभिमान बाळगून सर्व नागरिकांनी नगर शहर कायम कसे स्वच्छ व सुंदर राहील यासाठी प्रशासनास सहकार्य करावे. जोवर पूर्ण नगर शहर स्वच्छ व सुंदर होणार नाही तोवर मी स्वस्थ बसणार नाही, असे यावेळी आ.संग्राम जगताप म्हणाले. शहराची डीप क्लीन मोहीम यापुढेही रोज सुरु राहणार आहे. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनीही शहराच्या स्वच्छतेकडे जबाबदारीने कटाक्ष ठेवावा. कामचुकार कर्मचाऱ्यांची हयगय न करता कडक कारवाई करा. नागरिकांनीही आपला परिसर स्वच्छ राहण्यासाठी आपलेही कर्तव्य आहे याची जाणीव ठेवावी, असे आवाहन आ. जगताप यांनी केले.

### शहराच्या डीप क्लीन स्वच्छतेसाठी माऊली सभागृह ते नव्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जणारा रस्ता केला चकाचक



शहराच्या डीप क्लीन स्वच्छता मोहिमे अंतर्गत आ.संग्राम जगताप यांनी माऊली सभागृह, मॅककेअर हॉस्पिटल ते नव्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जणाऱ्या रस्त्याची पाहणी करून कर्मचाऱ्यांकडून स्वच्छता करून घेतली. (छाया – लूह दळवी)

शहराच्या डीप क्लीन स्वच्छता मोहिमे अंतर्गत आ.संग्राम जगताप यांनी शनिवारी सकाळी ७ वाजताच सावेडी मधील माऊली सभागृह, मॅककेअर हॉस्पिटल ते नव्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जणाऱ्या रस्त्याची पाहणी केली. यावेळी उपस्थित महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे व अधिकाऱ्यांना शहराच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष न करता दरोरज डीप क्लीन मोहीम राबवण्याच्या सूचना आ.जगताप यांनी केल्या. तसेच यावेळी उपस्थित हायजीन फर्स्टच्या संचालिका वैशाली गांधी यांनीही स्वच्छतेच्या उपाययोजनांवर आ.संग्राम जगताप व अधिकाऱ्यांशी चर्चा करून महत्वच्या टिप्स दिल्या.

यावेळी आ.संग्राम जगताप यांनी आक्रमक व आग्रही भूमिका घेत या परिसरातील रस्त्याची स्वच्छता मनपाच्या कर्मचाऱ्यांना करायला लावली. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत, नाल्यातील गाळ, चिखल व माती तात्काळ काढण्याचे आदेश देत तेथे थांबून स्वच्छता करून घेतली. मॅककेअर हॉस्पिटल परिसरातील बेशिस्त व अनधिकृत पार्किंग व अस्वच्छते बाबत आ.जगताप यांनी नाराजी व्यक्त करत तेथील चारचाकी व दुचाकी गाड्यांवर त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसेच हॉस्पिटलला नोटीस बजावण्यास सांगितले. यावेळी उपायुक्त संतोष टेंगेळे यांनी स्वतः कारवाई करून काही दुचाकी वाहने उचलून टॉइंग व्हॅनमध्ये ठेवली. तसेच परिसरातील अस्ताव्यस्त वाढलेल्या झाडांच्या फांद्या छाटण्याच्या सूचना आ. जगताप यांनी पाहणीदरम्यान दिल्या.

यावेळी यशवंत डांगे, उपायुक्त संतोष टेंगेळे, शहर अभियंता मनोज पारखे, घनकचरा विभागप्रमुख अशोक साबळे आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## वकील बंधू भगिनींचे प्रश्न सोडवण्यासाठी लॉयर्स को-ऑप. सोसायटी कायम तत्पर

**चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे**

नगर – वकील बंधू भगिनींचे कोर्ट कामकाज सुकर व्हावे याकरिता सन १९८३ साली स्थापन केलेल्या संस्थेचे आज वटवृक्षात रूपांतर झालेले असून वकील बंधू भगिनींच्या दररोजच्या दैनंदिन कामात अविरत आणि महत्त्वपूर्ण असलेल्या अहमदनगर लॉयर्स को ऑपरेटिव्ह सोसायटीचे आम्ही पदाधिकारी असल्याबाबत आम्हाला सार्थ अभिमान आहे वाटत असल्याची प्रतिक्रिया अहमदनगर लॉयर्स को–ऑप सोसायटीच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये अहमदनगर लॉयर्स को–ऑप सोसायटीचे चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे यांनी व्यक्त केली.



अहमदनगर लॉयर्स को–ऑप सोसायटी ची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे आदी,.

अहमदनगर लॉयर्स को–ऑप सोसायटी ची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर लॉयर्स को–ऑप सोसायटीचे चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे होते. व्हा. चेअरमन ॲड. संदीप पाखरे, सेक्रेटरी ॲड. विनायक सांगळे, मा. व्हा. चेअरमन ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. हाफिज जहागिरदार, संचालिका ॲड. अनिता दिघे, संचालक ॲड. नामदेव वाकळे पा., ॲड. संदीप काळे, ॲड. चंदन बारटक्के, ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. सुधीर कुलकर्णी उपस्थित होते.

वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांच्या विविध प्रश्नांना चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे, व्हा. चेअरमन ॲड. संदीप पाखरे, सेक्रेटरी ॲड. विनायक सांगळे, माजी व्हा. चेअरमन हाफिज जहागीरदार, ॲड. अनिता दिघे यांनी उत्तरे देऊन सभासदांचे पूर्णपणे समाधान केले.

याप्रसंगी विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. राजेंद्र शेलोत, ॲड. रमेश कराळे, ॲड. अनुराधा येवले, ॲड. प्रज्ञा उजागरे, ॲड. स्वाती जाधव, ॲड. श्रुती पाखरे, ॲड. संस्कृती हलदार, ॲड. संतोष वाळुंज, ॲड. संतोष भोसे, ॲड. प्रभाकर शहाणे, ॲड. रफिक बेग, ॲड. गजेंद्र पिसाळ, संस्थेचे कर्मचारी सुनंदा घोलप, कोमल तरटे यांच्यासह वकील बंधू भगिनी उपस्थित होते.

सभेचे सूत्रसंचालन संचालिका ॲड. अनिता दिघे यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक व्हा. चेअरमन ॲड. संदीप पाखरे यांनी केले. चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे यांनी मनोगत व्यक्त केले. सेक्रेटरी ॲड. विनायक सांगळे यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. माजी व्हाईस ॲड. हाफिज जहागीरदार यांनी आभार मानले.

अहमदनगर जिल्ह्यातील मृत पावलेल्या वकील सभासदांसह जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले यांना देखील विशेष सर्वसाधारण सभेमध्ये श्रद्धांजली वाहण्यात आली.

## वकील संरक्षण कायदा तात्काळ लागू करावा

### मुख्यमंत्र्यांकडे किरण काळेंची मागणी; वकिलांवरील भ्याड हल्ल्याचा ठाकरे शिवसेनेकडून निषेध





नगर – शेवगाव येथे उलट तपासणीत विचारलेल्या प्रश्नांचा राग धरून वकिल रवींद्र सकट यांच्यावर विरोधी पक्षकाराने भ्याड प्राणघातक हल्ला केला. या घटनेचा ठाकरे शिवसेनेने जाहीर निषेध केला आहे. शहर प्रमुख किरण काळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे लेखी निवेदनाद्वारे वकिलांच्या संरक्षणासाठी प्रलंबित असणाऱ्या ॲडव्होकेट प्रोटेक्शन आणि ॲडव्होकेट वेलफेअर ॲक्ट बाबत तातडीने अध्यादेश जारी करत अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. भ्याड हल्ल्याचा काळे यांनी शहर ठाकरे शिवसेनेच्या वतीने जाहीर निषेध केला आहे.

काळे यांनी म्हटले आहे, वकिलांवर हल्ल्याची ही काही पहिली घटना नाही. यापूर्वी देखील राहुरी येथील वकील दांपत्याचा निर्घृण खून झाला. अहिल्यानगर सह महाराष्ट्रात वकिलांवर हल्ल्यांच्या घटना वारंवार घडत आहेत. कायद्याचे रक्षण करणारे, न्यायव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण स्तंभ असणारे वकीलच सुरक्षित नाहीत हे यातून पुन्हा एकदा समोर आले आहे. वकिलांच्या संरक्षणासाठी प्रस्तावित असणाऱ्या कायद्याचा मसुदा तयार आहे. तो शासना समोर धुळ खात पडला आहे. अनेक जिल्ह्यांचे बार असोसिएशन, महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनने देखील मसुद्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण सूचना शासनाकडे सादर केल्या आहेत. त्यांचा कायद्यामध्ये समावेश करण्याची मागणी काळे यांनी केली आहे.

**मुख्यमंत्र्यांना आस्था नाही :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः वकील आहेत. राज्यातील हजारो वकील सुरक्षित आहेत. हल्ल्यांच्या घटनांमुळे, पेशातील धोक्यांमुळे वकिलांचे कुटुंबीय अनेक वेळा भयग्रस्त मनस्थितीला सामोरे जातात. मात्र वकील असणाऱ्या मुख्यमंत्र्यांना वकिलांच्या प्रश्नांविषयी आस्था नाही हे महाराष्ट्राचे दुर्दैव असल्याची टीका किरण काळे यांनी केली आहे.

**वकील संघटनांना पाठिंबा :** भ्याड हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वकिलांचा आत्मसन्मान, सुरक्षा आणि बार कौन्सिलच्या स्वातंत्र्यासाठी तीन नोव्हेंबरला एक दिवसा करिता न्यायालयीन कामकाजा पासून अलिप्त राहून निषेध करण्याची भूमिका वकील संघटनांनी घेतली आहे. सरकारकडे मसुदा तात्काळ मंजूर करण्याची मागणी संघटनांनी केली आहे. याला ठाकरे शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख काळे यांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.०१/११/२०२५.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर हद्दीतील **मौजे भिस्तबाग येथील** खालील वर्णनाची प्लॉट मिळकत – सर्व्हे नं. २६/३ मधील प्लॉट नं.१ (संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं.२६/३/प्लॉट/१) चे एकुण क्षेत्रफळ ८३५.०० चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट. **यांसी चतुःसिमा :–**

पुर्वेस :– सर्व्हे नं.२६/६/३ दक्षिणेस :– ओढा

पश्चिमेस :– सर्व्हे नं.२६/५ उत्तरेस :– १२.०० मीटर रुंदीचा शिव रस्ता

वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –

**१. प्रताप भाऊसाहेब काळे,** रा. सावेडी, अहिल्यानगर.

**२. तेजस किरण कथडे,** रा. रासनेनगर, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**

पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला,साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर. मो : 9011678999. 9860805559

## सराफ व्यवसायिकांचे १ कोटींचे सोने लंपास करणाऱ्या टोळीला तात्काळ अटक करा : शिवसेनेचे किरण काळे



नगर – मध्यवर्ती शहरातील सराफ व्यावसायिकांची संगनमतातून संघटितरित्या ६ परप्रांतीय कारागिरांनी ८ सराफ व्यवसायिकांच तब्बल १ कोटी रुपयांचे सोने लंपास करून पोबारा केला. सोने लंपास करणाऱ्या या टोळीचा पर्दाफाश करून त्यांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे उद्धव ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या घटनेबाबत कोतवाली पोलीस स्टेशन येथे गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. मात्र अद्यापही आरोपी फरार आहेत.

काळे यांनी निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहराला सराफ बाजाराची मोठी परंपरा आहे. शहरातील सराफ व्यवसायिकांकडे अनेक परप्रांतीय कामगार काम करतात. दागिन्यांची घडणावळ करणे विशेष कौशल्यावर आधारित काम आहे. त्यामुळे कुशल असणाऱ्या परप्रांतीय कामगारांना कामावर विश्वास ठेवून मोठी जोखीम व्यवसायिकांना पत्करावी लागते. या घटनेमुळे सराफ व्यावसायिकांचे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शहरात अन्य व्यावसायिकांकडे देखील परप्रांतीय कामगार मोठ्या प्रमाणावर काम करत असताना पाहायला मिळते. आधी विश्वास संपादन करायचा. नंतर मालकाचा विश्वासघात करत फसवणूक, चोरी करून हे परप्रांतीय कामगार पोबारा करतात. यापूर्वी देखील अशा अनेक घटना समोर आल्या आहेत.

### व्हेरिफिकेशनची विशेष मोहीम पोलिसांनी हाती घ्यावी

अशा घटनांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील सर्व परप्रांतीय कामगारांचे तात्काळ पोलीस व्हेरिफिकेशन करण्याची विशेष मोहीम पोलिसांनी हाती घ्यावी. व्यापारी बांधवांनी देखील अशा कामगारांना कामावर ठेवण्यापूर्वी त्यांचे व्हेरिफिकेशन करून घेण्याचे आवाहन किरण काळे यांनी केले आहे. ज्या परप्रांतीय कामगारांवर यापूर्वी गुन्हे दाखल आहेत त्यांची नावे, छायाचित्र यांची माहिती पोलिसांनी सार्वजनिक करावीत. जेणेकरून अशा कामगारां पासून व्यावसायिक सावध राहतील. याबाबत उचित कार्यवाही करण्याच्या शहरातील सर्व पोलीस निरीक्षकांना सूचना करण्याची मागणी काळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

## आर्मी पब्लिक स्कूल, नगर येथे प्राचार्य पदासाठी अर्ज मागविले

नगर – आर्मी पब्लिक स्कूल (एमआयसीएस), अहिल्यानगर येथे प्राचार्य पदासाठी पात्र उमेदवारांकडून ४ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. प्राचार्य पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे स्नातकोत्तर (Post Graduate) पदवी किंवा तत्सम शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. बी.एड. (B.Ed.) पदवी अनिवार्य आहे. उच्च माध्यमिक किंवा माध्यमिक स्तरावर किमान पाच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा. सर्वसाधारण उमेदवारांसाठी जास्तीत जास्त वय ५५ वर्षे, तर भूतपूर्व सैनिक उमेदवारांसाठी जास्तीत जास्त वय ५७ वर्षे (अर्जाच्या अंतिम दिनांकापर्यंत) राहील.

पात्रता, अनुभव आणि इतर निकषांच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यात येईल. पात्र उमेदवारांना पॅनल मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवाराचे वेतन चर्चेनुसार निश्चित करण्यात येईल. एडब्ल्यूईएसच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार इतर भत्ते व लाभ देण्यात येतील.

अर्जाचा नमुना शाळेच्या संकेतस्थळावरून (www.apsmicsahmednagar.com) डाउनलोड करावा. पूर्ण भरलेला अर्ज, बायोडाटा (जन्मतारीख व नवीन छायाचित्रासह), अध्यापनाचा तसेच उपप्राचार्य/प्राचार्य/प्रशासकीय कार्याचा अनुभव, सेवाकाळाची माहिती, शैक्षणिक प्रमाणपत्रे व प्रशस्तिपत्रांच्या प्रती, ई–मेल आयडी, मोबाईल क्रमांक व संपूर्ण टपाल पत्ता यासह संचालक, मुख्यालय दक्षिण कमांड (.W.E.S.), पिन – ९०८५४१, C/O ५६. P.O., पुणे – ४११००१ या पत्त्यावर फक्त हार्ड कॉपी स्वरूपात सादर करावा.

